अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १७२ । रविवार ५ एप्रिल २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## प्रपंच आणि सहजयोग यांचा काय संबंध आहे?

**'सहजयोग' भाग १७**



'पंच' काय तर आपल्यामध्ये जी पंचमहाभूते आहेत त्यांनी निर्माण केलेली परिस्थिती आणि 'प्र' म्हणजे ह्या पंचमहाभूतांमध्ये ज्यांनी प्रकाश पडला आहे तो प्रपंच. 'अवघाची संसार सुखाचा करेन' असे जे म्हटले आहे ते सुख प्रपंचातच मिळायला पाहिजे. प्रपंच सांगून परमेश्वर मिळविता येत नाही. विशेषकरून महाराष्ट्रामध्ये जेवढे संत – होऊन गेले. त्या सगळ्यांनी प्रपंच केला फक्त रामदासस्वामींनी प्रपंच नाही केला. पण प्रत्येक दासबोधातून प्रपंच वाहतो आहे. 'प्रपंच काढून कोणी परमेश्वर मिळवू शकत नाही' हे त्यांचे वाक्य अनेकदा आले आहे . प्रपंचातून उठून आपण परमेश्वर मिळवायचा ही कल्पना बरेच वर्षापासून आपल्या देशात आलेली आहे. सगळ्या संत– साधूंनी सांगितले की, 'सहज समाधी लागो.' कबीरांनी लग्न केले होते. नानकांनी लग्न केले होते. जनकापासून आतापर्यंत परंपरागत जेवढे काही मोठे मोठे अवधूत झाले. सगळ्यांची लग्ने झाली होती आणि त्यानंतर बरेच असे होते ज्यांनी लग्न नाही केले परंतु 'लग्न संस्था ही चुकीची आहे किंवा ज्याला आपण प्रपंच म्हणतो ते चुकीचे आहे' असे कोणी म्हटलेले नाही. तेव्हा सर्वप्रथम आपण डोक्यातून ही कल्पना काढून टाकली पाहिजे की जर योग मार्गाला तुम्ही आले तर तुम्हाला प्रपंच सोडावा लागेल. उलट प्रपंच जर करायचा असेल तर सहजयोगात जरूर या.

– २९ नोव्हेंबर १९८४ पब्लिक प्रोग्राम, मुंबई

## गोवा महामार्गावर अपघातात श्रीरामपूरचा तरुण ठार, तिघे जखमी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर काल रात्री भीषण अपघात होऊन त्यात एक जण जागीच ठार झाला असून तिघे गंभीर जखमी झाले आहेत. यातील मयत तरुण श्रीरामपूर येथील आहे.

नाशिक जिल्ह्यातील कांती येथे राहणारा प्रतीक संजय भंडारी (वय २८) हा त्याचे नाशिक येथील कृष्णा संपत आव्हाड (वय ३४), संदीप चंद्रभान धिरंगे (वय ३०) व रोहित संतोष भालेकर (वय २८) यांना त्याची महिंद्रा एक्सक्यूव्ही ३०० या कारने गणपती पुळे येथे पर्यटनासाठी चालले होते. चिपळूणजवळील परशुराम घाटात कार चालकाने भरधाव वेगाने गाडी चालवत असताना एका वळणावर चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने कार रस्त्याच्या डाव्या बाजूला पलटी होवून भीषण अपघात झाला. या अपघातात मूळ श्रीरामपूर येथील सध्या नाशिक येथे राहणारा रोहित संतोष भालेकर हा जागीच ठार झाला. तर कृष्णा संपत आव्हाड, संदीप चंद्रभान धिरंगे, प्रतीक संजय भंडारी सर्व रा. नाशिक हे गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने चिपळूण येथील लाइफ केअर रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या अपघातात गाडीचा चुराडा झाला आहे.



रोहित भालेकर

या अपघाताची माहिती मिळताच मुंबई महामार्ग केंद्राचे पोलिस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी गाडीचा चुराडा झालेला असल्याने चौघांना बाहेर काढले. महामार्ग पोलिस उपनिरीक्षक इर्शाद बेग, पोलीस कॉन्स्टेबल शिंदे, श्री. पुंड, श्री. धने यांनी पंचनामा करून घटनेची माहिती घेतली. यातील मयत रोहित संतोष भालेकर हा मूळचा श्रीरामपूरचा असून काही महिन्यापूर्वी त्याचे वडील संतोष भालेकर यांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर हे कुटुंब नाशिक येथे गेले.

# नाशिकमध्ये 'खरात पार्ट २'

# १२१ महिलांच्या लैंगिक शोषणाचा 'लघुउद्योग' उघड

## लघुउद्योजक कन्सल्टंटचा 'ऑफिसबॉय'ने केला भंडाफोड

## गुन्हा दाखल : रवींद्र एरंडेसह चौघांना अटक, व्हिडीओ जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तेहरान :** अमेरिका इस्रायलने इराणमधील सर्वात मोठा उंच पूल नष्ट केल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. इराणला पाषाण युगात पाठवण्याच्या धमकीनंतर अमेरिकेने काही तासांत हा हल्ला केला. स्थानिक अधिकाऱ्यांच्या मते, अलबोर्ज परिसरातील हा बी–१ ब्रिजवर मोठा हल्ला झाला. त्यात प्रचंड नुकसान झाले आहे. या हल्ल्यात कमीत कमी ८ लोक मारले गेलेत तर ९५ लोक जखमी झालेत अशी माहिती दिली. सातत्याने होणारे हल्ले पाहता आखाती प्रदेशातील तणाव शांत होण्याऐवजी आणखी चिघळण्यासाठी शक्यता वर्तवली जात आहे.



आखाती देशात अमेरिका इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेले युद्ध आणखी पेटण्याची चिन्हे दिसत आहेत. आताच वेळ आहे, इराणनं तडजोड करावी अन्यथा त्यांच्याकडे काहीच शिल्लक राहणार नाही अशी धमकी डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली होती. त्यानंतर या दोन्ही देशात तणाव वाढला. ट्रम्प यांच्या धमकीला इराणचे राष्ट्रपती मसूद पझेश्कियन यांनी प्रत्युत्तर दिले. इराण अमेरिका आणि इस्रायलच्या हल्ल्याचा सामना करण्यासाठी पूर्ण तयार आहे. आम्ही पूर्ण क्षमता वापरू. इराण मागे हटणार नाही असे त्यांनी स्पष्ट सांगितले. अमेरिका इस्रायलने इराणवरील हल्ले वाढवले आहेत. तेहरानमधील १०० वर्ष जुन्या मेडिकल रिसर्च सेंटरवर टार्गेट हल्ला करण्यात आला आहे.

या हल्ल्यानंतर इराणनेही इशारा दिला आहे. हे युद्ध आता तोपर्यंत सुरू राहील जोपर्यंत शत्रूंची नाचक्की आणि गुडघे टेकत नाही. इराणने अमेरिकेला संभाव्य जमिनीवरील कारवाईवरूनही सुनावले आहे. इराणने अबूधाबीतील गॅस फॅसिलिटीवरही हल्ल्याचा प्रयत्न केला आहे. इराणचा हा हल्ला हवेतच रोखल्याची अबूधाबीतील अधिकाऱ्यांनी माहिती दिली. मात्र मलब्यामुळे गॅस फॅसिलिटीत नुकसान झाल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, इराणने कुवेतच्या पाणी प्लांटवरही हल्ला केला आहे. एका खार पाणी शुद्धीकरण प्रकल्पावर इराणने हल्ला केला आहे. आपत्कालीन पथके सध्या घटनास्थळी असून बचाव आणि मदतकार्य करत आहेत असं कुवेतच्या विद्युत आणि जल मंत्रालयाने सांगितले. हा तोच प्रकल्प आहे जो समुद्राचे पाणी पिण्यायोग्य बनवतो. जर इराणने आखाती देशांतील जलप्रकल्पांवर हल्ले करणे सुरूच ठेवले तर इथल्या देशांना पाण्याच्या प्रत्येक थेंबासाठी झटावं लागेल.

**ज्या व्हिडिओवरून ऑफिसबॉयसह चौघे संशयित हे फिर्यादी एरंडे याला ब्लॅकमेल करीत होते, ते हार्डडिस्क, २ पेनड्राइव्ह व मोबाईल संशयितांकडून पोलिसांनी जप्त केले आहे. त्याची तपासणी करताना पोलिसही चक्रावले. कारण त्यात, २००३ ते २०२४ दरम्यान १२१ हून अधिक महिलांचे अश्लील व्हिडिओ आढळून आले. ऑफिसमध्ये लावलेल्या कॅमेऱ्याद्वारे हे रेकॉर्डिंग केल्याचे दिसून येत आहे. ज्या महिला शोषणाला बळी पडल्या आहेत, त्यांनी न घाबरता पुढे यावे. पीडितांची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल असे आवाहन पोलिसांनी केले आहे.**

**विशेष संपादकीय...**

करण नवले

## शेती महामंडळाचे 'पांढरे हत्ती' आणि कामगारांचा वनवास!

महाराष्ट्र राज्याच्या कृषी इतिहासात ज्या शेती महामंडळाचा उल्लेख एकेकाळी 'हरितक्रांतीचे मॉडेल' म्हणून केला जायचा, त्याच महामंडळाच्या हजारो कामगारांच्या आयुष्यात गेल्या चार दशकांपासून जो अंधार दाटला होता, त्यावर अखेर न्यायदेवतेने प्रकाशाचा एक किरण टाकला आहे. अहमदनगर येथील औद्योगिक न्यायालयाने शेती महामंडळाच्या कामगारांना चौथ्या वेतन आयोगाची ५० कोटी ९४ लाखांची थकबाकी दोन महिन्यांत अदा करण्याचे दिलेले आदेश, हा केवळ एका न्यायालयीन प्रक्रियेचा भाग नाही, तर तो व्यवस्थेने नाकारलेल्या हजारो कष्टकऱ्यांच्या संघर्षाचा नैतिक विजय आहे.

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची स्थापना १९६३ मध्ये 'सीलिंग' कायद्याच्या अंतर्गत करण्यात आली. ज्या बड्या जमीनदारांकडे मर्यादेपेक्षा जास्त जमीन होती, ती जमीन काढून घेऊन ती सरकारी मालकीच्या महामंडळाकडे सोपवण्यात आली. यामागील मुख्य उद्देश हा होता की, महाराष्ट्रात साखर उद्योगाला लागणारा कच्चा माल म्हणजेच ऊस, शास्त्रीय पद्धतीने आणि मोठ्या प्रमाणावर पिकवला जावा. महामंडळाच्या ताब्यातील हजारो एकर जमिनीवर आधुनिक शेतीचे प्रयोग झाले, दर्जेदार बियाण्यांचे उत्पादन झाले आणि राज्याच्या तिजोरीत या महामंडळाने कोट्यवधींचा महसूल जमा केला. एका काळी या महामंडळाची आर्थिक उलाढाल इतकी मोठी होती की, ते राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेचा कणा मानले जात असे.

मात्र, काळाच्या ओघात राजकारण, अकार्यक्षम व्यवस्थापन आणि बदलत्या धोरणांमुळे या 'नफ्यातील' महामंडळाला घरघर लागली. ज्या उद्देशाने हे महामंडळ स्थापन झाले, तो बाजूला राहिला आणि हे महामंडळ केवळ 'पांढरा हत्ती' ठरले. **(पान २ वर...)**

## अंजुमभाई शेख यांचा स्विकृत नगरसेवक पदाचा राजीनामा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष अंजुमभाई शेख यांनी आपला स्विकृत नगरसेवक पदाचा अवघ्या तीन महिन्यातच राजीनामा दिल्यामुळे श्रीरामपूर शहरातील राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

अंजुमभाई शेख यांनी अचानकपणे स्वीकृत नगरसेवक पदाचा राजीनामा आ. हेमंत ओगले यांच्याकडे दिला असून त्याची प्रत नगराध्यक्ष करण ससाणे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन गुजर यांच्याकडे दिल्याचे समजते. दरम्यान व्यक्तिगत कारणास्तव आपण राजीनामा देत असल्याचे राजीनामा पत्रात अंजुम शेख यांनी म्हटले असले तरी यामागील खरे कारण मात्र समजू शकले नाही. या निर्णयामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांच्या भुवया उंचावल्या आहेत. श्रीरामपूर नगरपालिकेच्या राजकारणात गेल्या ३० वर्षांहून अधिक काळ अंजुम शेख यांनी काम केले आहे. ते आणि त्यांच्या पत्नी सौ. समिना शेख हे दोघेही पालिकेत बिनविरोध नगरसेवक म्हणून यापूर्वी निवडून आलेले आहेत. अंजुम शेख हे अनेक वर्षे नगरसेवक म्हणून राहीलेले आहेत. उपनगराध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केलेले आहे. नुकत्याच झालेल्या **(पान ४ वर...)**



**मंत्रालयात भेटीनंतर निर्णय**

अंजुम शेख यांनी काँग्रेसचे आमदार हेमंत ओगले आणि करण ससाणे यांच्या उपस्थितीत मंत्रालयात एका ज्येष्ठ मंत्र्याची भेट घेतली. त्यानंतर श्रीरामपूरला आल्यावर अंजुम शेख यांनी राजीनाम्याचा निर्णय घेतल्याचे सांगण्यात येते.

## किरकोळ वादातून तरुणाचा खून

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील वळण येथे काल दि. ४ एप्रिल रोजी दुपारच्या वेळी झालेल्या किरकोळ वादातून एका तरुणावर चाकूचे वार करण्यात आल्यायाने या घटनेतील तरुण ठार झाला असून झालेल्या या भयंकर घटनेमुळे वळण परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेनंतर पोलीस पथकाने संशयित आरोपीला तात्काळ ताब्यात घेतल्याची माहिती मिळाली आहे. सदर घटनेतील कृष्णा ऊर्फ दादा शंकर कुलट, वय २६ वर्षे असे मयत झालेल्या तरुणाचे नाव असून कृष्णा ऊर्फ दादा कुलट व संशयित आरोपी उद्धव खुळे यांच्यात काल दि. ४ एप्रिल २०२६ रोजी दुपारी **(पान ४ वर...)**



राहुरी तालुक्यातील वळण येथे किरकोळ वादातून झालेल्या बाचाबाचीत एका तरुणावर चाकूचे वार करण्यात आल्याने त्यामध्ये तो तरुण मयत झाल्याची घटना घडली आहे. पोलीस पथक ताबडतोब घटनास्थळी जाऊन संशयित आरोपीला ताब्यात घेतले असून पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

**–संजय ठेंगे,**
**पोलीस निरीक्षक राहुरी**

## कॅप्टन खरातची शिर्डी परिसरात मनी लॉड्रिंग

### समता, जगदंबा शनीच्या फेऱ्यात

**अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** कॅप्टन खरातच्या मोबाईलमधून अनेक खजीना बाहेर येत असून त्याच्या संपर्कातील व्यक्ती ची नावे, त्याने शारीरीक संबंध ठेवलेल्या उच्चभ्रू स्त्रिया , जमीनीचे व्यवहार तसेच त्याने गुंतवणूक केलेला पैशांचा हिशोब एस आय टी च्या तपासात दररोज नवीन खुलासे होत असून त्याने कोपरगावच्या समता पतसंस्थेत शेकडो खाते उघडून करोडो रुपयांचे व्यवहार केले असल्याचे उघड झाले असून कॅप्टन खरात ने मनी लॉड्रीग साठी शिर्डी परिसराची निवड केल्याचे निष्पन्न झाले आहे.



समता पतसंस्थेचे अध्यक्ष संदीप ओमप्रकाश तथा काका कोयटे यांनी पत्रकार परिषद घेऊन आमचे सर्व व्यवहार कायदेशीर असल्याचे कारण पुढे केले असून स्पष्टिकरण दिले आहे . मात्र यामागे समता पतसंस्था व कॅप्टन खरात चे कनेक्शन उघड झाले आहे.

राहाता येथील समता पतसंस्थेत कॅप्टन खरात वारसदार असलेली सुमारे शंभर खाती एकाच दिवशी उघडण्यात आल्याचे दिसन. येते आहे . त्यातील अनेक खातेदारांची शुक्रवारी चौकशी करण्यात आली. आम्ही ही खाती उघडली नाहीत. आमची कागदपत्रे खरी असली तरी आमची स्वाक्षरी नाही आहे असा जबाब पोलिसांना दिला आहे, त्यामुळे आता या मागे कोण कोण आहेत? याची चौकशी पोलीस घेत आहे.

राहाता येथील समता पतसंस्थेत उघडण्यात आलेल्या **(पान ४ वर...)**

**पाया पडलो, भक्त नाही : कोयटे**

मी एका कार्यक्रमात त्यांचा सत्कार केला, पाया पडलो ही आपली संस्कृती आहे. मला तीन वर्षांपूर्वी नाशिकला एका कार्यक्रमात कॅप्टन खरात व माझी भेट झाली, हिंदू संस्कृतीत पाया पडण्याची प्रथा आहे माझा ज्योतिष वर अजिबात विश्वास नाही, जुने व्हिडिओ काढून व्हायरल करत आहेत ते योग्य नाही. पाच–सहा कोटीचे व्यवहार आमच्या संस्थेत झाले मोठ्या रकमेची व्यवहार कदापी झाले नाही. चाकणकर नाव आता मला कळाले, त्या रूपालीच्या बहिण आहे की नाही, हे मी पाहिले नाही.

## शेती महामंडळ कामगारांना मिळणार ५१ कोटींची थकबाकी!

### औद्योगिक न्यायालयाचे आदेश : ४० वर्षांच्या लढ्यानंतर ऐतिहासिक विजय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** गेल्या अनेक दशकांपासून आपल्या हक्काच्या थकीत वेतनासाठी लढा देणाऱ्या महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या कामगारांना अखेर न्याय मिळाला आहे. अहमदनगर येथील औद्योगिक न्यायालयाने शेती महामंडळाला १ जानेवारी १९८६ ते ३१ डिसेंबर २००७ या कालावधीतील चौथ्या वेतन आयोगाची थकीत रक्कम दोन महिन्यांच्या आत अदा करण्याचे ऐतिहासिक आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे कामगार वर्गात आनंदाचे वातावरण पसरले असून हा कामगार एकजुटीचा मोठा विजय मानला जात आहे.

औद्योगिक न्यायालयाच्या न्यायमूर्ती समिना खान यांनी १६ मार्च २०२६ रोजी हा महत्वपूर्ण निकाल दिला. त्यानुसार १ जानेवारी १९८६ ते ३१ डिसेंबर २००७ या कालावधीतील चौथ्या वेतन आयोगाची ५० कोटी ९४ लाख रुपये थकबाकी महामंडळाने द्यायची आहे. यापूर्वी मिळालेली ३ कोटी ४७ लाख रुपयांची रक्कम वजा करून उर्वरित रक्कम कामगारांना दिली जाईल. आदेशाच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत ही रक्कम न दिल्यास, महामंडळाला ६ टक्के प्रतिवर्ष दराने व्याज भरावे लागणार आहे.

१ जानेवारी २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत कामगार संघटनेशी चर्चा करून तातडीने **(पान ४ वर...)**

**कामगारांमध्ये आनंदाची लाट**

न्यायालयाच्या आदेशामुळे केवळ आर्थिक लाभच मिळणार नाही, तर रोजंदारीवर काम करणाऱ्यांना समान वेतन, बोनस आणि उपदान (ग्रेच्युटी) मिळण्याचा मार्गही मोकळा झाला आहे. थकबाकीच्या व्याजाच्या तरतुदीमुळे महामंडळावर आता ही रक्कम तातडीने देण्याचा दबाव निर्माण झाला आहे. त्यामुळे या निकालाने कामगार आनंदले.



पत्ता- औदुंबर चौक, वर्धमान ट्रेडर्सच्या समोर, कुंभकर्ण बिल्डिंग, नेवासा, जिल्हा अहिल्यानगर | www.samatapat.com | +917722 010 222

(पान १ वरुन) **संपादकीय**

## शेती महामंडळाचे 'पांढरे हत्ती' आणि कामगारांचा वनवास!

शेती महामंडळाचा ऱ्हास सुरू झाला तो जमिनींच्या फेरवाटपाच्या निर्णयाने. मूळ खंडकऱ्यांना (जमीन मालकांना) जमिनी परत देण्याचे धोरण आले आणि महामंडळाच्या ताब्यातील जमिनीचे तुकडे पडण्यास सुरुवात झाली. काही जमिनी भाडेतत्वावर देण्याचे प्रयोग झाले, तर काही ठिकाणी अतिक्रमणांनी ग्रासले. या सर्व गोंधळात सर्वात जास्त भरडला गेला तो या महामंडळाचा कणा असलेला 'कामगार'.

१९८६ पासून जेव्हा संपूर्ण राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना नवीन वेतन आयोग लागू होत होते, तेव्हा शेती महामंडळाच्या कामगारांना मात्र जुन्याच तुटपुंज्या पगारावर राबवून घेतले जात होते. राबराब राबणाऱ्या या कामगारांनी उन्हातान्हात शेती फुलवली, पण त्यांच्या घराची चूल पेटवण्यासाठी त्यांना कायम 'लढा'च द्यावा लागला. रामराजे निंबाळकर समितीने चौथ्या वेतन आयोगाची शिफारस करूनही, शासनाने ती कागदावरच ठेवली. तत्कालीन मंत्र्यांनी तडजोडी केल्या, शासन निर्णय निघाले, पण प्रत्यक्षात कामगारांच्या हातात छदामही पडला नाही. ही केवळ आर्थिक पिळवणूक नव्हती, तर हा त्यांच्या मानवी हक्कांवर झालेला अन्याय होता.

गेल्या २०-२५ वर्षांत शेती महामंडळाच्या हजारो कामगारांनी आपले आयुष्य न्यायालयाच्या वाऱ्या करण्यात घालवले. अनेक कामगार हक्काचे पैसे न मिळताच निवृत्त झाले, तर काहींचा मृत्यूही झाला. कोपरगाव, श्रीरामपूर आणि श्रीगोंदा येथील कामगार संघटनांनी दिलेला हा लढा महाराष्ट्राच्या कामगार चळवळीतील एक महत्त्वाचा अध्याय आहे.

औद्योगिक न्यायालयाने आता दिलेला निकाल हा डोळे उघडणारा आहे. ५० कोटी ९४ लाखांची थकबाकी आणि ती न दिल्यास ६ टक्के व्याजाचा बडगा, हे स्पष्टपणे महामंडळाच्या आणि शासनाच्या ढिसाळ कारभारावर ओढलेले ताशेरे आहेत. १ जानेवारी १९८६ ते २००७ या प्रदीर्घ काळातील थकबाकी रखडवणे, हे लोककल्याणकारी राज्याला शोभणारे नाही.

न्यायालयाने आता महामंडळाला सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबतही तोडगा काढण्याचे निर्देश दिले आहेत. आता चेंडू राज्य सरकारच्या आणि महामंडळ प्रशासनाच्या कोर्टात आहे. शासनाने या निकालाला पुन्हा वरिष्ठ न्यायालयात आव्हान देऊन कामगारांचा वनवास वाढवू नये, हीच पहिली आणि प्रमुख अपेक्षा आहे.

दोन महिन्यांच्या मर्यादेत ही ५० कोटींची रक्कम देण्यासाठी विशेष निधीची तरतूद करावी. जर ही रक्कम वेळेत दिली नाही, तर व्याजापोटी जनतेच्या पैशांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी. केवळ सहाव्याच नव्हे, तर आता सातव्या वेतन आयोगाच्या काळातही हे कामगार वंचित आहेत. त्यांच्यासाठी एक सर्वसमावेशक 'एक्झिट प्लॅन' किंवा पुनर्वसन धोरण आखावे. महामंडळाच्या पडीक जमिनी किंवा मालमत्तेचा वापर करून कामगारांची देणी भागवण्याचा प्रयत्न व्हावा.

शेती महामंडळाचे काम थांबले असले, तरी तिथल्या कामगारांचे जगणे थांबलेले नाही. रक्ताचे पाणी करून राज्याच्या शेतीला वैभव मिळवून देणाऱ्या या घटकाला आता तरी सन्मानाने निवृत्तीचे किंवा थकबाकीचे पैसे मिळायला हवेत. न्यायालयाने दिलेला हा 'न्याय' केवळ कागदावर राहू नये, तर तो कामगारांच्या बँक खात्यापर्यंत पोहोचला, तरच या निकालाचा खऱ्या अर्थाने सन्मान होईल. उशिरा मिळालेला न्याय हा न्याय नाकारण्यासारखा असतो, ही म्हण शेती महामंडळाच्या बाबतीत खोटी ठरवण्याची संधी आता राज्य सरकारकडे आहे.

# कोकमठाण येथे आ.आशुतोष काळेंच्या हस्ते विकास कामांचे भूमिपूजन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : कोकमठाण येथे स्थानिक आमदार विकास निधीतून पुणतांबा रोड मारुती मंदिर ते देशमुख वस्ती या रस्त्याचे डांबरीकरण करणे (४०लाख), नागरी सुविधा विकास योजने अंतर्गत पुणतांबा रोड ते धोंडीराम गायकवाड वस्ती ते रेलवाडी मारुती मंदिर या रस्त्याचे खडीकरण (३० लाख) व गावांतर्गत बाजारपेठ विकसित करून अंतर्गत रस्ते सिमेंट कॉन्क्रेटिकरण करणे (२५ लाख) अशा एकूण ९५ लाखांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

यावेळी आमदार आशुतोष काळे यांनी सांगितले की, कोपरगाव मतदारसंघातील ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी कटिबद्ध असून मागील सहा वर्षात रस्ते विकासाच्या माध्यमातून दळणवळणाचे मार्ग अधिक सक्षम करण्यासाठी केलेल्या प्रयत्नातून अनेक रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत तर काही रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. रेलवाडी रस्त्यावर असलेल्या अनेक मोठ्या खड्ड्यांमुळे पावसाळ्यात साचलेल्या पाण्यातून, चिखलातून स्थानिक नागरिकांना, शाळकरी विद्यार्थी आणि शेतकऱ्यांना प्रवास करतांना असंख्य अडचणींचा सामना करावा लागत होता. याच




रस्त्यावरून शेतकऱ्यांना शेतातून शेतमालाची ने-आण करतांना जीव घेणी कसरत करावी लागत होती अशा अनेक अडचणी रस्त्यामुळे नागरीकांना येत होत्या. तसेच पावसाळ्यात बाजारपेठेतील चिखलामुळे भाजी विक्रेत्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. या अडचणी दूर करण्यासाठी रस्ते आणि बाजारपेठेच्या विकासासाठी निधी देवून नागरीकांच्या अडचणी कायमच्या मार्गी लावल्या असल्याचे त्यांनी सांगितले. त्याबद्दल कोकमठाण ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करून आ.आशुतोष काळे यांचे आभार मानले आहे.

यावेळी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुधाकरराव रोहम, दिलीपराव बोरणारे, सुरेश जाधव, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष चारूदत्त सिनगर, माजी संचालक बाळासाहेब बारहाते, माजी पंचायत समिती सदस्य मधुकरराव टेके, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती गोवर्धन परजणे, गौतम सहकारी बँकेचे व्हा.चेअरमन विजय रक्ताटे, कोपरगाव जिनिंग व प्रेसिंग सोसायटीचे संचालक महेश लोंढे, गोदावरी खोरेचे केन ट्रान्सपोर्ट कंपनीचे संचालक विजयराव थोरात, शिरीष लोहकणे, सुदाम लोंढे, सुनील लोंढे, दादासाहेब साबळे, शांताराम लोहकणे, संजय थोरात, अरविंद रक्ताटे, दिपक रोहम, ज्ञानेश्वर रक्ताटे, संजय थोरात, विजय रक्ताटे, भाऊसाहेब काशिद, अनंत रक्ताटे, विशाल जाधव, डॉ.आशिष डूबे, सिद्धार्थ लोहकणे, शिवाजी कराळे, शरद फटांगरे, मधुकर रक्ताटे, संभाजी देशमुख, संतोष लोंढे, बनेमिया सय्यद, प्रशांत मोरे, वाल्मीक कापे, संभाजी गायकवाड, विजय थोरात, सुखदेव महाजन, प्रभाकर धिवर, विजय देशमुख, शांताराम त्रिभुवन, अविनाश निकम, कैलास कदम, सचिन जाधव, प्रभाकर आबक, तुषार बाराहाते, राजेंद्र रोहाम, अजित रक्ताटे, गणेश बाराहाते, अरविंद रक्ताटे, सदाशिव रक्ताटे, संदीप धिवर, राजेंद्र भाकरे, जावेद सय्यद, मधुकर रोहम, प्रकाश देशमुख, शिवाजी देशमुख, दिलीप देशमुख, दिलावर सय्यद, परसराम लोहकणे, राहुल सोळसे, अजय थोरात, विजय भोसले, सुरेश काशिद, अलाउद्दीन सय्यद, दत्तात्रय हाडोळे, दिपक रक्ताटे, रवींद्र खाडे, गोरक्षनाथ लोहकणे, बांधकाम विभागाचे रणजित तामखाणे, राजेंद्र रोहोम, ग्रामसेवक विजय पाटील, राष्ट्रवादी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## श्री दत्त नवनाथ देवस्थानात परायणाची सांगता

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील मुकींदपूर येथील श्री दत्त नवनाथ देवस्थानमध्ये गणेश महाराज शेजुळ यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित त्रिदिनात्मक पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाची पिचडगाव येथील माऊली आश्रमाचे प्रमुख महंत हभप ज्ञानेश्वर महाराज हजारे यांच्या काल्याच्या किर्तनाने शुक्रवारी दि.४ एप्रिल रोजी भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली.

मनुष्य जीवनात संत महात्म्याकडे पाहून परमार्थाची वाटचाल करा,जीवनाचे सार्थक होईल असे प्रतिपादन ज्ञानेश्वर महाराज हजारे यांनी केले.

ुकींदपूर येथील यश मंगल कार्यालयात झालेल्या काल्याच्या कीर्तनात बोलतांना ज्ञानेश्वर महाराज म्हणाले की संत महात्मे आल्यानंतर



आपल्याला नेहमी आनंद होत असतो,हा आनंद जीवनात कायम टिकविण्यासाठी देव आणि संतांच्या मार्गाने चालून जीवनात परमार्थ करा त्यामुळे खरी सुख समाधानाची प्राप्ती होईल,जीवनात परमार्थाची वाटचाल संत महात्म्यांकडे पाहून करा असा संदेश त्यांनी दिला.

किर्तन प्रसंगी त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत स्वामी रमेशानंदगिरीजी महाराज,शिनाई देवस्थानचे महंत आवेराज महाराज, सीतारामबाबा पठाडे, साहेबराव महाराज चावरे,पारायण व्यासपीठ प्रमुख शंकर महाराज सुसे, कृष्णा महाराज शेजुळ, सोहळा संयोजक गणेश महाराज शेजुळ, संतसेवक लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे, दत्तात्रय महाराज व्यवहारे यांच्या उपस्थितीत काल्याची दहीहंडी फोडून त्रिदिनात्मक सोहळयाची सांगता करण्यात आली.

## हनुमंतगावात अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय सांगता

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनगाव** : राहाता तालुक्यातील हनुमंतगाव येथे श्रीराम नवमी ते हनुमान जयंती या कालावधीत पार पडलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता भक्तिमय वातावरणात झाली. वरवंडी देवस्थानचे दत्तगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह संपन्न झाला.

समारोप प्रसंगी ह.भ.प. भागवत महाराज सातभाये यांच्या प्रभावी काल्याच्या कीर्तनाने वातावरण भारावून गेले. कीर्तनात त्यांनी काला म्हणजे जीव आणि ब्रह्म यांचे ऐक्य असल्याचे सांगत गोकुळातील गवळणींच्या भक्तीचे उदाहरण दिले. प्रभू श्रीरामांचे चरित्र आचरणीय तर भगवान श्रीकृष्णांचे चरित्र उच्चारणीय असल्याचे सांगत संस्कारांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.




सप्ताह काळात दररोज नामवंत कीर्तनकारांनी हरिनामाचा गजर केला. ज्ञानराज वारकरी संस्था, आश्वी येथील बाल टाळकरी यांनी हरिपाठ व कीर्तन सेवेत सहभाग घेतला. ज्ञानेश्वरी पारायण, तुकाराम गाथा, भजन व हरिपाठ यांचेही आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी सप्ताह कमिटी व एकलव्य सेनेतर्फे विविध कीर्तनकार व कलाकारांचा सत्कार करण्यात आला. सप्ताहादरम्यान अन्नदान व पाणी व्यवस्थाही करण्यात आली. काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता झाली. कार्यक्रमासाठी ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

## हिंदू संस्कृतीचे रक्षण करणे ही काळाची गरज : महंत आदिनाथ हारदे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**ताहाराबाद** : हिंदू संस्कृती जगातील सर्वात श्रेष्ठ संस्कृती असून, वारकरी सांप्रदायामुळे ही संस्कृती व्यवस्थित आहे. पाश्चात्य संस्कृतीवर हिंदू संस्कृती मात करत आहे. म्हणून संस्कृतीचं रक्षण व जतन करणं ही काळाची गरज आहे, असा उपदेश महंत आदिनाथ महाराज हारदे यांनी केला आहे.

ताहाराबाद येथील गाडकवाडीच्या हनुमान जयंतीनिमित्त सप्ताहाची काल्याच्या कीर्तनाने सांगता झाली. त्यावेळी काल्याच्या कीर्तनात हारदे महाराजांनी भगवंताच्या विविध लीला सांगून भाविकांना मंत्रमुग्ध केले. संपूर्ण परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला. काल्याच्या कीर्तनात श्रीकृष्णाच्या



बालपणापासूनच्या सर्व लीला महाराजांनी सांगून हिंदू संस्कृतीवर प्रकाश टाकला. रामायण व महाभारत ही दोन हिंदू महाकाव्य आहे. ह्या दोन ग्रंथामुळे हिंदू संस्कृती उदयाला आली. पाश्चात्य संस्कृतीमुळे हिंदू संस्कृतीचा ऱ्हास होता कामा नये, असे त्यांनी सांगितले. सालाबादप्रमाणे श्रीराम नवमी ते हनुमान जयंती ह्या पर्वणीत गाडकवाडी येथे हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा मोठ्या हर्षेउल्लासात भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. सप्ताह कालावधीत काकडा भजन, अभिषेक, आरती, प्रवचन, हरिपाठ व नंतर कीर्तन असे आध्यात्मिक कार्यक्रम संपन्न झाले. सप्ताहात महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तन सेवा झाली. सप्ताहाची सांगता आदिनाथ महाराज हारदे यांच्या काल्याच्या कीर्तनाने व महाप्रसादाने झाली. परिसरातील भाविकांनी त्याचा आनंद द्विगुणित केला.

> गाडकवाडी येथील सप्ताह उत्तरोत्तर वाढत आहे. पूर्वी अन्नदान होत नसे. आता अन्नदाते सप्ताहात भाविकांना मिष्ठांन्नाच्या पंगती देतात.ग्रामस्थांची एकी असल्यामुळे ह्या सप्ताहाला वटवृक्षाचे स्वरूप आले आहे.
>
> **-बापूसाहेब जगताप, ग्रामपंचायत सदस्य.**

## भैरवनाथ देवस्थानला रुग्णवाहिकेची भेट ; विनोद अहिरे यांचा सत्कार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : तालुक्यातील धामोरी येथील सामाजिक कार्यकर्ते विनोद अहिरे यांनी त्यांच्या वडील कै. मारुती अहिरे यांच्या स्मरणार्थ भैरवनाथ देवस्थान ट्रस्टला सुसज्ज अद्ययावत रुग्णवाहिका भेट दिली. या समाजोपयोगी कार्याबद्दल त्यांचा संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपाध्यक्ष ज्ञानेश्वर परजणे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी बोलताना बिपीनदादा कोल्हे म्हणाले की, समाजाचे देणे फेडणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा असून कोरोना काळात रुग्णवाहिकेचे महत्त्व सर्वांनी अनुभवले. ग्रामीण भागात तात्काळ आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी विनोद अहिरे यांनी रुग्णवाहिका देऊन मोलाचे कार्य केले असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ संजीवनी उद्योग समूहाच्या वतीने कोपरगाव मतदारसंघात फिरता दवाखाना सुरू करून रुग्णांच्या दारापर्यंत सेवा पोहोचविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

या प्रसंगी संचालक विश्वासराव महाले, बाळासाहेब वक्ते, विलासराव माळी, राहुल वाणी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन विलासराव माळी यांनी केले.

## व्यंकटेश बनकरला ग्रीको महाराष्ट्र केसरी स्पर्धेत कांस्यपदक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान:** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभानचा भूमिपुत्र व्यंकटेश दिलीप बनकर याने वर्धा जिल्ह्यातील देवळी येथे पार पडलेल्या ग्रीको महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा( ८७ ज्ञस) २०२५ - २६ यामध्ये कास्य पदक पटकावले असून स्पर्धेचे आयोजक मा. खा. रामदास तडस व मान्यवरांच्या हस्ते त्यास कांस्यपदक प्रदान करण्यात आले. महाराष्ट्रमध्ये



कुस्तीपटूंसाठी प्रतिष्ठेच्या व मानाच्या समजल्या जाणाऱ्या या स्पर्धांमध्ये कुस्तीपटू व्यंकटेश बनकर यांने पटकावलेल्या कांस्यपदकामुळे टाकळीभानची मान पुन्हा एकदा अभिमानाने उंचावली आहे. या स्पर्धेसाठी प्रत्येक जिल्ह्यातून कुस्तीपटूंनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये आपले कौशल्य दाखवत व्यंकटेश याने यश संपादन केले आहे. शालेय जीवनापासून व्यंकटेश बनकर यास कुस्ती व शरीर सौष्ठव स्पर्धेची आवड होती. त्याप्रमाणे विविध कुस्ती स्पर्धेत सहभाग घेत त्याचे प्रयत्न सुरू होते. आंतरराष्ट्रीय पैलवान शंकर कंधारे यांच्या गुरुकुल कुस्ती संकुल सोमाटणे फाटा, मावळ, पुणे यामध्ये त्याचा सराव सुरू होता. त्याला शिवाजी मोहिते यांनी प्रशिक्षक म्हणून यशस्वीरित्या मार्गदर्शन केले. त्याच्या या यशामध्ये स्वतःची जिद्द, मेहनत व कुटुंबीयांची साथ मोलाची ठरली. त्याच्या कुटुंबियांनी त्याच्यातील गुण ओळखून त्याला सरावासाठी पुण्याला पाठवले. व ग्रीको महाराष्ट्र केसरी स्पर्धा यामध्ये त्यांने कास्यपदक मिळवत कुटुंबासह गावाचे नाव उज्वल केले. त्याच्या या उज्वल यशाबद्दल सर्व स्तरातून त्याचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

## अशोक साखर कारखान्याच्या पुनरुत्थानासाठी 'अशोक विकास आघाडी'ची स्थापना

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तालुक्यातील अशोक सहकारी साखर कारखान्याच्या पुनरुत्थानासाठी 'अशोक विकास आघाडी'ची स्थापना करण्यात आली असून अध्यक्षपदी किशोर गंगाधर पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने आयोजित मेळाव्यात हा निर्णय घेण्यात आला. कारखान्याच्या सद्य आर्थिक स्थितीवर चर्चा करण्यासाठी आयोजित बैठकीस सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, आजी-माजी कामगार व 'अशोक'प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी व्यवस्थापनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. कामगारांना मागील ९ ते १० महिन्यांपासून वेतन न मिळाल्याची, तसेच शेतकऱ्यांना ऊसदर वेळेत व समाधानकारक न मिळाल्याची तक्रार करण्यात आली. बैठकीत शासनाने संचालक मंडळ बरखास्त करून सक्षम प्रशासक नेमावा, कारभाराची चौकशी करून भ्रष्टाचारातून झालेल्या नुकसानीची वसुली करावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच वाहतूक व्यवस्थेतील अनियमिततेमुळे शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याचा आरोप करत या व्यवहारांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. थकीत वेतनाबाबत शासनाने हस्तक्षेप करून किमान पाच महिन्यांचे वेतन तातडीने देण्याचे निर्देश द्यावेत, अन्यथा प्रशासक नेमणुकीनंतर कामगार व शेतकऱ्यांच्या देयकांना प्राधान्य द्यावे, अशीही मागणी करण्यात आली.

# गॅस ग्राहकांनी संयम पाळावा : डॉ. इंगळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : सध्या जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे पेट्रोलियम पदार्थांच्या पुरवठ्यावर काही प्रमाणात परिणाम होत आहे. तरीही केंद्र सरकार व ऑईल कंपन्यांनी सामान्य घरगुती ग्राहकाला केंद्रस्थानी ठेवत कोणत्याही परिस्थितीत घरातील चूल अखंड सुरू राहावी. यासाठी उपाययोजना केल्या आहेत असे गॅस वितरक प्रतिनिधी डॉ लक्ष्मण इंगळे यांनी वृत्तपत्राला दिलेल्या माहितीत तसेच विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना सांगितले.

अनेक ग्राहक सिलेंडर



मिळेल की नाही या भीतीपोटी २५ दिवस होताच सिलेंडर बुक करतात. वितरक त्यानुसार नियोजन करून डिलिव्हरीसाठी कर्मचारी पाठवतो; मात्र त्या वेळी सिलेंडर पूर्ण संपलेला नसल्याने कर्मचाऱ्याला परत जावे लागते. त्यामुळे त्याचे श्रम वाया जातात व दुसऱ्या गरजू ग्राहकाला वेळेवर गॅस मिळण्यात अडथळा निर्माण होतो. सर्वसाधारण कुटुंबाला साधारण ४० दिवसांनी गॅस लागत असल्यास ३५ दिवसांनी सिलेंडर बुक केल्यास वेळेवर गॅस मिळू शकतो.

घरगुती गॅस सिलेंडरचा कोणत्याही परिस्थितीत व्यावसायिक वापर करू नये, तसेच कोणी कितीही पैसे देऊ केले तरी सिलेंडर व्यावसायिकाला देऊ नये.

> **गॅस ग्राहकांनी लक्षात ठेवा....**
>
> गरज नसताना सिलेंडर बुक करू नये; साधारण ३५ दिवसांनी बुक करणे योग्य प्रत्येक ग्राहकाने आपले केवायसी पूर्ण केले आहे. याची खात्री करावी गॅस कनेक्शन धारकाचा मृत्यू झाल्यास कनेक्शन इतर सदस्याच्या नावावर करावे,घरगुती सिलेंडरचा व्यावसायिक वापर करू नये,इंधन बचतीसाठी वितरकांनी सुचविलेल्या उपायांचा अवलंब करावा.

# कर्मवीरांना अभिवादन !

## कोपरगावात १०५ वी जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : माजी खासदार, सहकार चळवळीतील अग्रणी नेते आणि शिक्षणप्रेमी स्व.कर्मवीर शंकररावजी काळे साहेब यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त सोमवार (दि.०६) रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने सकाळी ९.०० वाजता पंचायत समिती, कोपरगाव येथे व त्यानंतर सकाळी ०९.३० वा. कारखाना कार्यस्थळावरील कर्मवीर शंकरराव काळे स्मृती-उद्यान, गौतमनगर येथे पुष्पांजली कार्यक्रम होणार असल्याची माहिती कर्मवीर शंकरराव काळे मित्र मंडळाचे अध्यक्ष कारभारी आगवन यांनी दिली आहे.

या जयंती सोहळ्यास माजी आमदार अशोकराव काळे, गौतम बँकेच्या माजी संचालिका पुष्पाताई काळे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन आमदार आशुतोष काळे, जिल्हा बँकेच्या माजी संचालिका चैतालीताई काळे, तसेच कारखान्याचे व्हा.चेअरमन, संचालक मंडळ, मित्र मंडळाचे सदस्य व उदयोग समूहाच्या विविध संलग्न संस्थांचे चेअरमन, व्हा.चेअरमन,पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.





स्व.कर्मवीर शंकरराव काळे यांनी सहकार, शिक्षण, कृषी व सिंचन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. ग्रामीण भागातील शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या उन्नतीसाठी त्यांनी सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून आर्थिक बळकटी दिली.त्यांच्या नेतृत्वामुळे कोपरगाव तालुक्यासह परिसरातील सहकार चळवळीला नवे बळ मिळाले.शिक्षण क्षेत्रातही त्यांचे योगदान मोलाचे असून, रयत शिक्षण संस्थेच्या विस्तार आणि वाढीसाठी त्यांनी विशेष परिश्रम घेतले. संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचा वारसा पुढे घेऊन जात ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा पोहोचविण्यासाठी स्व.कर्मवीर शंकररावजी काळे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे शिक्षण, उद्योग व सहकार क्षेत्रात अनेक संस्था उभ्या राहिल्या आणि हजारो कुटुंबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. त्यांच्या १०५ व्या जयंती सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन कर्मवीर शंकरराव काळे मित्र मंडळाचे उपाध्यक्ष नारायणराव मांजरे यांनी केले आहे.

## कर्णबधिर मुलांनी लुटला पाळण्यांचा आनंद; श्रीरामपूरात अनोखा उपक्रम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : रामनवमी यात्रेनिमित्त शहरात आलेल्या पाळण्यांमध्ये कर्णबधिर मुलांना मोफत सफर घडवून त्यांच्या आयुष्यात आनंदाचे रंग भरण्याचा उपक्रम राबविण्यात आला. राष्ट्रीय श्रीराम संघाचे अध्यक्ष सागर बेग व सामाजिक कार्यकर्ते तिलक डुंगरवाल यांच्या पुढाकारातून हा उपक्रम पार पडला.दरवर्षी रामनवमीनिमित्त भरत असलेल्या यात्रेत पाळणे हे मुख्य आकर्षण असते. मात्र दिव्यांग मुलांना हा आनंद घेणे अनेकदा शक्य होत नाही. ही बाब लक्षात घेऊन शहरातील कर्णबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांना यात्रेचे निमंत्रण देत सर्व पाळण्यांची सफर मोफत उपलब्ध करून देण्यात



आली. पाळण्यात बसल्यानंतर मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साह पाहण्यासारखा होता. आनंद सर्वांसाठी समान आहे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. सागर बेग यांनी उत्सव म्हणजे केवळ गर्दी नव्हे, तर वंचितांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणे हीच खरी सेवा आहे, असे सांगितले. तर तिलक डुंगरवाल यांनी दिव्यांग मुलांना सहानुभूतीपेक्षा समजून घेण्याची गरज असल्याचे नमूद केले. या उपक्रमामुळे समाजासमोर एक आदर्श निर्माण झाला असून उपस्थितांनी त्याचे कौतुक केले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# दखल

## अहिल्यानगरात संत-सद्गुरूंचे आगमन; प्रवचनाचा लाभ घ्या



**नेवासा** : अहिल्यानगर शहरातील भक्तांसाठी आनंदाची बातमी असून संत-सद्गुरूंच्या दर्शन व प्रवचनाचा लाभ घेण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. गुरुदत्त भक्तीधाम, संत किसनगिरीनगर मंदिर येथे रविवार (दि. ५ एप्रिल २०२६) रोजी सायंकाळी ६.३० वाजता देवगड संस्थानचे महंत राष्ट्रसंत भास्करगिरीजी महाराज तसेच जोधपूर, राजस्थान येथील गोवत्स राधाकृष्ण महाराज यांचे आगमन होणार आहे. या प्रसंगी भक्तांना दोन्ही संतांच्या दर्शनाचा लाभ मिळणार असून राधाकृष्ण महाराज यांच्या मधुर वाणीतील प्रवचनाचा लाभही घेता येणार आहे. भक्ती, अध्यात्म आणि सत्संगाचा संगम अनुभवण्याची ही दुर्मिळ संधी असल्याने भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.सर्व भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री समर्थ सद्गुरु किसनगिरीबाबा नगर भक्तमंडळ व बन्सी महाराज मिठाईवाले यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## सावरगाव तळला म्हसोबा महाराजांचा आज यात्रा उत्सव



**संगमनेर** : संगमनेर तालुक्यातील सावरगाव तळचे ग्रामदैवत म्हसोबा महाराज यांच्या यात्रोत्सवानिमित्त तीन दिवस विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सावरगाव तळ यात्रा उत्सव निमित्त प्रथमच यात्रा कमिटीच्या वतीने बैल गाडा शर्यत भरविण्यात आल्या होत्या. या शर्यतीचे उद्घाटन आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेसाठी संगमनेर, अकोले, सिन्नर आणि जुन्नर तालुक्यातील सुमारे ५० ते ५५ बैलगाडा मालकांनी सहभाग नोंदवला होता. यात्रोत्सवा निमित्त रविवारी दुपारी गाडे वस्ती व गावातील अशा दोन मानाच्या काट्या काढण्यात येणार असून त्या वाजत गाजत म्हसोबा महाराज मंदिरात नेण्यात येणार आहे. यात्रेकरूंच्या करमणुकीसाठी सायंकाळी तमाशा सम्राट हरिभाऊ बडे यांच्या कन्या शिवकन्या बडे यांच्या लोकनाट्य तमाशा मंडळाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी हजेरीचा कार्यक्रम होणार असून सायंकाळी जंगी कुस्त्यांच्या हागाम्याने यात्रेची सांगता होणार आहे.या यात्रा उत्सवासाठी संगमनेर तालुक्यातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सावरगाव तळ यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

## पुणतांबा परिसरात विना नंबर वाहनांचा सुळसुळाट




**पुणतांबा** : गाव व परिसरात विना नंबरच्या दुचाकी, चारचाकी तसेच इतर वाहनांची वाढती संख्या चिंतेचा विषय ठरत आहे. या वाहनांमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.गोदावरी नदी काठावरील पुणतांबा हे गाव राहाता, कोपरगाव, श्रीरामपूर व वैजापूर या तालुक्यांच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने विविध भागांतून ये-जा मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे वाहनांची ओळख पटविणे कठीण बनले आहे. दरम्यान, परिसरातील नदीपात्रात पाणी कमी झाल्याने बेकायदा वाळू उपसा सुरू असून त्याच्या वाहतुकीसाठी विना नंबरच्या वाहनांचा सर्रास वापर होत असल्याची चर्चा आहे. अशा वाहनांवर कारवाई करण्यासाठी प्रादेशिक परिवहन विभाग (आरटीओ) तसेच पोलिसांकडून ठोस कारवाई होत नसल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली. कोपरगाव-पुणतांबा-श्रीरामपूर या राज्य मार्गावरही वाहतूक पोलिसांची अनुपस्थिती जाणवत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. परिणामी नियमभंग करणाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे.परिसरातील वाढती गुन्हेगारी व अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी आरटीओ व पोलिसांनी संयुक्त मोहीम राबवून विना नंबर वाहनांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# कुंभारी सबस्टेशनची क्षमता वाढली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : कोपरगाव मतदार संघातील अनेक सबस्टेशनच्या क्षमता वाढीसाठी आमदार आशुतोष काळे यांनी निधी दिल्यामुळे त्या सबस्टेशनवर अवलंबून असणाऱ्या कृषी, व्यावसायिक व घरगुती ग्राहकांच्या विजेच्या समस्या मार्गी लागल्या आहेत. यामध्ये कुंभारी सबस्टेशनची देखील भर पडली असून त्यामुळे कुंभारी बरोबरच या सबस्टेशनवर अवलंबून असणाऱ्या हिंगणी आणि माहेगाव देशमुख गावातील वीज ग्राहकांच्या समस्या कायमच्या संपुष्टात येणार आहेत.

कुंभारी व परिसरातील गावांच्या विजेच्या समस्या सोडवण्यासाठी माजी आमदार अशोकराव काळे यांनी त्यांच्या कार्यकाळात विशेष प्रयत्न करून कुंभारी सबस्टेशनची निर्मिती केली होती. या सबस्टेशनवर कुंभारी, हिंगणी, माहेगाव देशमुख, सोनारी, धारणगाव आदी गावांना वीजपुरवठा करण्याची जबाबदारी होती. परंतु काळानुरूप मोठ्या प्रमाणात कृषी,व्यावसायिक व घरगुती ग्राहकांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे या सबस्टेशनची क्षमता कमी पडत असल्यामुळे वीज पुरवठा करतांना अनेक अडचणी येत होत्या. त्यामुळे वारंवार वीज खंडित होणे, कमी दाबाने वीज पुरवठा होणे, तांत्रिक बिघाड होऊन शेतीपंप जळण्याचे प्रमाण वाढले होते व दिवसा पूर्ण दाबाने वीज पुरवठा करण्यात अडचणी येत होत्या.

वीज ग्राहकांना होणाऱ्या या त्रासाची दखल घेवून आमदार आशुतोष काळे यांनी कुंभारी सबस्टेशनची क्षमता ५ एमव्हीए वरून १० एमव्हीए पर्यंत वाढवण्यासाठी उर्जा विभागाकडे पाठपुरावा करून एक कोटी निधी मिळविला होता. या निधीतून या सबस्टेशनची क्षमता वाढ करण्यात आली असून कुंभारी सबस्टेशन आता १० एमव्हीए क्षमतेचे झाले असून नुकतेच आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते हे सबस्टेशन १० एमव्हीए क्षमतेने कार्यान्वित करण्यात आले आहे. त्यामुळे कुंभारी, हिंगणी, माहेगाव देशमुख, सोनारी, धारणगाव आदी गावांना कृषी पंपासाठी टप्याटप्याने होणारा वीजपुरवठा आता एकाचवेळी आणि तो देखील दिवसा होणार आहे त्यामुळे रात्रीच्या वेळी बिबट्याच्या भीतीपोटी जीव मुठीत धरून पाणी भरण्याची मोठी अडचण आमदार आशुतोष काळे यांनी दूर केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.



यावेळी आमदार आशुतोष काळे यांनी सांगितले की, दिवसेंदिवस विजेची मागणी वाढत आहे. परंतु सबस्टेशनची क्षमता कमी असल्यामुळे एकाचवेळी सर्व वीज ग्राहकांना वीजपुरवठा करणे अशक्य होते. त्यामुळे कोपरगाव मतदार संघात ज्या सबस्टेशनच्या क्षमता वाढविणे गरजेचे होते किंवा नवीन सबस्टेशन उभारणे गरजेचे आहे त्यासाठी उर्जा विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करून अनेक सबस्टेशनच्या क्षमता वाढविल्या असून काही ठिकाणी नवीन सबस्टेशन निर्मितीसाठी प्रयत्नशील असून हे प्रश्न लवकरच मार्गी लागणार आहे. त्यामुळे मतदार संघाच्या कृषी,व्यावसायिक व घरगुती ग्राहकांच्या विजेच्या समस्या कायमच्या संपुष्टात येतील असा विश्वास व्यक्त केला.याप्रसंगी महावितरणचे संगमनेर विभागाचे कार्यकारी अभियंता प्रदीप वट्टमवार, कोपरगाव उपविभागाच्या उपकार्यकारी अभियंता श्रीम.रंजना करसाळे, सहाय्यक अभियंता योगेश सोनवणे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक प्रशांत घुले, संभाजीराव काळे,मा.उपसभापती अर्जुनराव काळे, अशोक निळकंठ, अर्जुन घुले, दिगंबर बढे, सतिश कदम, सुभाष बढे, संजय घुले, दिनेश साळुंके, दिलीप ठाणगे, वसंत घुले, सचिन बढे, अभिजित चकोर, चंद्रभान बढे, सोपानराव ठाणगे, शंकरराव शेळके, त्र्यंबक वाघ, संतोष मोहरे, संजय नामदेव वारुळे, संजय भागवत वारुळे, आण्णासाहेब वारुळे, अशोक वारुळे, शिवाजी भारती, अतुल निळकंठ, संतोष वाघ, अक्षय काळे, रावसाहेब काळे, बाबासाहेब पानगव्हाणे, भागिनाथ काळे, शिवाजीराव लांडगे, प्रकाश काळे, सुनिल पवार, बाळासाहेब पवार, किरण दहे, धर्मा चंदनशिव, सागर पवार, धनराज पवार, रतन भवर, दत्तात्रय पवार, मच्छिन्द्र कुदळे, राहुल पवार, विजय पवार, नितीन मोरे, बाळासाहेब काळे, रमण गायकवाड आदी मान्यवरांसह कुंभारी, हिंगणी, माहेगाव देशमुख, सोनारी, धारणगाव येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी संशोधनावर भर द्यावा : पानसरे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : स्टार्टअप आणि इनोव्हेशन या माध्यमातून व्यवसाय निर्मितीसाठी मोठ्या संधी आहेत. प्रवरा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या माध्यमातून माजी विद्यार्थी हे कायमच महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी त्यांचा पुढाकार महत्त्वपूर्ण असतो याशिवाय विखे पाटील परिवाराच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नवनवीन तंत्रज्ञान आणि नवनवीन कौशल्य देण्यासाठी या ठिकाणी नेहमीच वेगवेगळे उपक्रम आणि सेवा सुविधा या दिल्या जातात यातून ग्रामीण विद्यार्थ्यांनी पुढे जाऊन संशोधनावरती आणि देश आत्मनिर्भर बनवण्यासाठी प्रयत्न करावेत असे प्रतिपादन

लॉजिकॉन टेक्नो सोल्युशन्सचे व्यवस्थापक एच.एस. पानसरे यांनी केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालय, लोणी येथील इन्स्ट्रुमेंटेशन आणि कंट्रोल इंजिनिअरिंग विभागाने 'टेक एक्स्पो-२०२६' या राष्ट्रीय स्तरावरील प्रकल्प स्पर्धेनिमित्त आयोजित कार्यक्रमात पानसरे बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील आणि संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे यांच्या संकल्पनेतून आयोजित कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालीनीताई विखे, एपीएसी बोर्ड आयएसए-एशिया आणि संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी गुरमित, ऑटोमेशन एल.एल.पी पुणे येथील हेमकुंड एमकेएसएसएस कमिन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग फॉर विमेन, पुणे येथील डॉ. स्वाती माढे, श्री. राकेश केदारी, एकर सोल्युशन्स, मुंबईचे राकेश केदारी, राहुल जगताप, डॉ. विश्वनाथ कराड,संस्थेचे सहसचिव भारत घोगरे,प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने आदी उपस्थित होते.

## हद्दवाढ भागाच्या विकासासाठी कटिबद्ध : संधान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कोपरगाव** : नगरपरिषद हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या धोंडीबा नगर व हनुमाननगर परिसरातील अंतर्गत रस्त्यांच्या खडीकरण व डांबरीकरणाच्या कामाचा शुभारंभ नगराध्यक्ष पराग संधान यांच्या हस्ते उत्साहात झाला. स्थानिक नागरिकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

मा. आमदार स्नेहलता कोल्हे यांच्या प्रयत्नांतून हा हद्दवाढ भाग नगरपरिषदेत समाविष्ट करण्यात आला होता. युवानेते विवेक कोल्हे व रेणुकाताई कोल्हे यांनीही या भागातील मूलभूत सुविधांसाठी सातत्याने पाठपुरावा केला. शासनाकडून मिळालेल्या निधीतून या विकासकामांना प्रारंभ करण्यात आला आहे.या वेळी बोलताना पराग संधान म्हणाले की, या भागातील नागरिकांना अनेक वर्षांपासून चांगल्या रस्त्यांची अपेक्षा होती. पावसाळ्यात होणाऱ्या गैरसोयी व दैनंदिन अडचणी दूर करण्यासाठी आता ठोस पावले उचलण्यात येत आहेत. कोपरगावचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास आरोग्य सभापती वैभव आढाव, तसेच विविध पदाधिकारी व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कामामुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## संगमनेरात काँग्रेसच्या 'संघटन सृजन' अभियानाला प्रतिसाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येत असलेल्या काँग्रेसच्या 'संघटन सृजन' अभियानांतर्गत संगमनेर येथे पदाधिकाऱ्यांची बैठक उत्साहात पार पडली. सर्व जाती-धर्म, युवक, महिला व नागरिकांना सोबत घेऊन पक्ष बळकट करण्याचे हे अभियान असल्याचे प्रतिपादन झारखंडचे माजी प्रदेशाध्यक्ष राजेश ठाकूर यांनी केले.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर आयोजित या बैठकीत ते बोलत होते. यावेळी ओडिसाचे माजी मंत्री सरत राऊत, खासदार डॉ. शिवाजीराव काळगे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, डॉ. जयश्रीताई थोरात आदी उपस्थित होते.राजेश ठाकूर म्हणाले की, देशात वाढत असलेले जातीपातीचे व भेदभावाचे



राजकारण धोकादायक असून त्याविरुद्ध काँग्रेस सर्वांना सोबत घेऊन लढत आहे. बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली अहिल्यानगर जिल्ह्यात पक्ष अधिक सक्षम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तरुणांनी सक्रिय होऊन पक्षाची विचारधारा प्रत्येक घरापर्यंत पोहोचवावी, असे आवाहनही त्यांनी केले. सरत राऊत यांनी संगमनेर हा काँग्रेसच्या विचारांचा बालेकिल्ला असल्याचे सांगत सहकार व शिक्षण क्षेत्रातील कार्य देशासाठी दिशादर्शक असल्याचे नमूद केले. डॉ. काळगे यांनी राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेमुळे सामान्य कार्यकर्त्यांच्या भावना समजून घेण्यास मदत झाल्याचे सांगितले.जिल्हाध्यक्ष सचिन गुजर यांनी काँग्रेसच्या कठीण काळातही बाळासाहेब थोरात यांची निष्ठा अधोरेखित केली. डॉ. जयश्रीताई थोरात यांनी काँग्रेसची विचारधारा सर्वसमावेशक असल्याचे सांगत कार्यकर्त्यांनी जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरावे, असे आवाहन केले.कार्यक्रमास तालुका व परिसरातील पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## समता पतसंस्थेचे व्यवहार पारदर्शक : संदीप कोयटे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : समता पतसंस्थेचे सर्व व्यवहार पूर्णपणे पारदर्शक व कायद्याच्या चौकटीत होत असून अफवा व चुकीच्या बातम्यांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन संस्थेचे संचालक संदीप कोयटे यांनी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत केले. संस्थेची ग्राहक संख्या सुमारे एक लाख दहा हजार असून वार्षिक उलाढाल दोन हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याची माहिती त्यांनी दिली. गेल्या चाळीस वर्षांपासून संस्थेने विश्वासार्हता टिकवून ठेवली असून पुढेही तीच परंपरा कायम राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी सरव्यवस्थापक सचिन भट्टड उपस्थित होते.

कोयटे म्हणाले की, संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्रभर विस्तारलेले असून कोणालाही खाते उघडता येते. कॅप्टन अशोक खरात यांच्याशी संबंधित खातीही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करूनच उघडण्यात आली आहेत. संबंधित व्यवहार नियमांनुसार झाले असून शिर्डी पोलिसांनी मागवलेली माहिती अवघ्या दोन तासांत सादर करण्यात आली. पोलिसांच्या सूचनेनुसार संशयित खाती तत्काळ गोठवण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.ठेवीदारांच्या सुरक्षेबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, ९९ टक्के खातेदारांची साठ लाख रुपयांपर्यंतची रक्कम 'लिक्विडिटी बेस्ट प्रोटेक्शन स्कीम' अंतर्गत सुरक्षित आहे. त्यामुळे ठेवीदारांनी घाबरण्याचे कारण नसल्याचे त्यांनी नमूद केले. संस्थेचे चेअरमन ओमप्रकाश (काका) कोयटे हे राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष असून सामाजिक कार्यक्रमांतून विविध व्यक्तींशी संपर्क येतो. अशोक खरात यांच्याशी केवळ एका कार्यक्रमात भेट झाली असून त्यावरून चुकीचे अर्थ लावू नयेत, असेही त्यांनी सांगितले.दरम्यान, पोलिस तपासात अडथळा येऊ नये म्हणून गोपनीयता राखली जात असून संबंधित व्यवहार मे २०२१ ते जानेवारी २०२६ या कालावधीत झाले आहेत. चार खात्यांमध्ये सुमारे तीस लाख रुपये शिल्लक असून बहुतेक व्यवहार ऑनलाइन पद्धतीने झाले असल्याची माहिती देण्यात आली. माध्यमांनी जबाबदारीने वार्तांकन करावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

## गळनिंब शिवारात भुरट्या चोऱ्यामध्ये वाढ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर तालुक्यातील गळनिंब परिसरात गेल्या काही दिवसांपासून भुरट्या चोरट्यांनी शेतकऱ्यांच्या वीजपंपावर चोरट्यानी लक्ष केंद्रित केले.त्यामुळे एकीकडे शेती पिकाला अवकाळीचा मोठा दणका बसला आहे.त्याच भुरट्या चोरीच्या घटना प्रमाण वाढले आहेत. याबाबत, मांडवे (ता. श्रीरामपूर) येथील शेतकऱ्यांनी लोणी पोलिसांत चोरीची तक्रार दाखल केली.बरेच दिवस उलटूनही याच तक्रारची कोणतीही दखल पोलिस प्रशासनाकडून घेतली जात नसल्याने शेतकऱ्यानी संताप व्यक्त केला. या पोलिसाच्या अजब कारभारामुळे चोरट्यांचे मात्र चांगलेच फावत आहे. गेल्या काही दिवसांपासून गळनिंब व मांडवे व परिसरात चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहेत. जरी काही शेतकऱ्याच्या केबली, स्टार्टर या मुद्देमालाची किंमत कमी असल्याने नसती झंझट नको, म्हणून नागरिक पोलिसांत फिर्याद देत नाहीत.मात्र काही शेतकरी वर्गाच्या चक्क पाणबुडी मोटारी चोरून नेल्याने शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान झाले.

याचा फायदा उचलत आता चोरट्यांनी शेतकऱ्यांच्या वीजपंपावर लक्ष केंद्रित केले आहे.मांडवे, व गळनिंब, परिसरांतील अनेक शेतकऱ्यांच्या शेतातून वीजपंप चोरट्यांनी चोरून नेले.याबाबत तक्रार देऊन देखील यातील एकही चोरीचा अद्याप उघडकीस आलेली नाही. यावर गळनिंब शिवारातून चोरट्यांनी वीजपंप चोरून नेला असून, बारा ते पंधरा शेतकऱ्याच्या मोटारीसह केबली चोरून नेल्याच्या घटना समोर आल्या आहे. या तक्राराची कोणतीही दखल अद्यापही पोलिस प्रशासनाने घेतलेली नाही, हे विशेष. गेल्या वर्षभरापासून भुरट्या चोरीचा सिलसिला सुरुच असल्याचे बोलले जाते. शेती पिकाचे गारपीटाने नुकसान झाले असताना तेच भुरट्या चोरीचे प्रकार वाढल्याने शेतकरी अडचणीत आले आहे.

### पालकमंत्र्याची भेट घेणार

राज्याचे जलसंपदामंत्री व पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील व माजी खासदार सुजय विखे पाटील यांची गळनिंबचे ग्रामस्थाचे शिष्टमंडळ समक्ष भेट घेणार आहे.वारंवार होत असलेल्या भुरट्या चोरीच्या घटनेबाबत तक्रार करणार असल्याचे सांगण्यात आले.अशी माहिती श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती आण्णासाहेब शिंदे गळनिंब सोसायटीचे संचालक बाळासाहेब वडितके यांनी दिली.

## सोनईत राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेला उत्साहात प्रारंभ

### माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या हस्ते उद्घाटन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : यशवंत स्पोर्ट्स क्लब सोनई व माजी मंत्री शंकरराव गडाख मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचा शुभारंभ शनिवारी दि.४ एप्रिल रोजी सायंकाळी उत्साहात पार पडला. माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या हस्ते व्हॉलीबॉल उडवून स्पर्धेचे उदघाटन करण्यात आले.

या कार्यक्रमाला नेवासा बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील, मुळा कारखान्याचे चेअरमन नानासाहेब तुवर, माजी सभापती रावसाहेब कांगुणे, भारत गडाख, कारभारी डफाळ, रंगनाथ जंगले, बाबा अनारसे, दत्तात्रय बेल्हेकर, डॉ. रामनाथ बडे, सुभाष राख, अजय लोंढे, संतोष क्षीरसागर, आप्पासाहेब निमसे, संदीप कुसळकर, अनिल भागवत आदींसह सोनई परिसर व जिल्हाभरातील मोठ्या संख्येने व्हॉलीबॉलप्रेमी उपस्थित होते.



ही स्पर्धा शनिवार दि.४ एप्रिल) व रविवार दि.५ एप्रिल या दोन दिवसांत दिवस-रात्र अशा स्वरूपात खेळवली जाणार आहे. उद्घाटनाचा सामना संभाजीनगर व मालेगाव संघांमध्ये रंगला. यावेळी बोलताना माजी मंत्री शंकरराव गडाख म्हणाले की सोनई व नेवासा तालुक्यात क्रीडा संस्कृती वृद्धिंगत व्हावी आणि नवोदित खेळाडूंना व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.पुढील काळातही तालुक्यातील खेळाडूंना प्रोत्साहन देऊन त्यांच्या माध्यमातून तालुक्याचे नाव उंचावण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष राख, डॉ. रामनाथ बडे, भाऊसाहेब गडाख व अनिल गडाख यांनी केले.

## कोपरगावच्या सार्थकची बास्केटबॉल स्पर्धेत यश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कोपरगाव** : नाशिक येथे महाराष्ट्र बास्केटबॉल असोसिएशन व नाशिक जिल्हा बास्केटबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३१ मार्च ते ४ एप्रिल २०२६ या कालावधीत १८ वर्षांखालील मुला-मुलींच्या राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत कोपरगावच्या सार्थक सोनवणे लक्षवेधी खेळी करत जिल्ह्याचे नाव उंचावले. राज्यभरातील विविध जिल्हा संघांच्या सहभागामुळे स्पर्धेला विशेष रंगत आली होती.

या स्पर्धेसाठी कोपरगाव येथील सोमैया विद्याविहार संचलित श्री शारदा इंग्लिश मिडीयम स्कूलचा होतकरू खेळाडू सार्थक सोनवणे याची अहिल्यानगर जिल्हा संघात निवड झाली होती. स्पर्धे दरम्यान सार्थकने आपल्या उत्कृष्ट खेळाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्याच्या वेगवान खेळशैली, अचूक पासिंग आणि निर्णायक क्षणी केलेल्या प्रभावी कामगिरीमुळे संघाला मोठा फायदा झाला. सार्थकच्या या यशामागे त्याची जिद्द, सातत्यपूर्ण सराव तसेच प्रशिक्षक गणेश मोरे व गणेश वाघ यांचे मोलाचे मार्गदर्शन असल्याचे सांगितले जाते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सार्थकने आपल्या कौशल्यात सातत्याने प्रगती केली आहे.या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सोमैया ट्रस्टचे अध्यक्ष समीर सोमैया, गोदावरी बायो रिफायनरीचे सुहास गोडगे, शाळेचे प्राचार्य के. एल. वाकचौरे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सार्थकचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.सार्थकच्या यशामुळे कोपरगाव शहरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, तो इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे.

प्रो.फी. जमा रू.
प्रो. पा. नं.
ने. ता.१८/०६/ २०२६

के. बी. शेख,
ॲडव्होकेट, श्रीरामपूर
ता.०२/०४/२०२६

**जाहीर नोटीस**

नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब, (सि.डी) यांच्या कोर्टात
रे.मु.नं. ९४६/२०२५ नि.
अजरूद्दीन रफीक बेग ...**वादी**
**विरूद्ध**
एकनाथ श्रीधर शिरसाठ.........**प्र.वादी**

प्रति,
प्रतिवादी क्रमांक २. राजेंद्र रावसाहेब वैरागर, रा. बेलपिंपळगाव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर
प्रतिवादी क्रमांक ३. संदीप कुसालाल चोरडीया,रा. बेलपिंपळगाव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर यासी..

आपणास या जाहीर नोटीसी ने कळविण्यात येते की, वादी यांनी तुमचे व इतरांविरुद्ध या मेहरबान कोर्टात स्पेसिफिक रिलीफ ॲक्ट कलम ३७,३८ व सी.पी.सी ऑर्डर २६ रूल ९ अन्वये दावा दाखल केलेला आहे. तुम्हास सदर दाव्याचे अनुषंगाने मेहरबान कोर्टामार्फत नोटीस बजावणी बाबत आदेश होवुनही बजावणी झालेली नाही. सबब तुम्हास या नोटिसीने कळविण्यात येते की, सदर प्रकरणात पुढील तारीख १८/०६/२०२६ ही नेमलेली आहे. सबब सदर तारखेच्या दिवशी सकाळी १०:३० वाजता तुम्ही स्वतः अगर माहितगार वकील साहेब मार्फत योग्य त्या पुराव्यानिशी या मेहरबान कोर्टात हजर रहावे, तुम्ही वर नमूद दिवशी व वेळी मेहरबान कोर्टात हजर न राहिलेस तुमच्या विरुद्ध पुढील आदेश पारित केला जाईल. आज रोजी दि. ०२/०४/२०२६ माझे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी दिले असे.

कामगिरी क्लर्क, दिवाणी न्यायालय क. स्तर, नेवासा

शिक्का

अधिक्षक दिवाणी न्यार्यालय क. स्तर, नेवासा

# पान १ वरुन

## शेती महामंडळ कामगारांना मिळणार ५१ कोटींची थकबाकी!

तोडगा काढण्याचे आदेशही न्यायालयाने महामंडळाला दिले आहेत. खंडकऱ्यांना जमिनींचे वाटप होत असतानाच रामराजे निंबाळकर समितीने कामगारांना चौथ्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी देण्याची शिफारस केली होती. राज्य सरकारने अहवाल स्वीकारला, मात्र अंमलबजावणी केली नाही. २००९ मध्ये तत्कालीन महसूल मंत्री स्व. पतंगराव कदम यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत ९९ कोटी ५० लाखांच्या तडजोडीवर शिक्कामोर्तब झाले होते. मात्र, १५ सप्टेंबर २००९ चा शासन निर्णय होऊनही महामंडळाने पूर्ण रक्कम दिली नव्हती.

अखेर, कोपरगाव तालुका साखर कामगार सभेचेने सुभाष कुलकर्णी, अविनाश आपटे, श्रीगोंदा तालुका साखर कामगार युनियनचे आनंदराव वायकर यांनी औद्योगिक न्यायालयात दाद मागितली होती. या कायदेशीर लढाईत कामगार संघटनांच्या वतीने ॲड. दीपक चंगेडे आणि ॲड. देवेंद्र असनीकर यांनी अत्यंत प्रभावीपणे कामगारांची बाजू मांडली. शेती महामंडळाच्या वतीने ॲड. अशोक पाटील यांनी कामकाज पाहिले.

## कॅप्टन खरातची शिर्डी परिसरात मनी लॉड्रिंग

१०० संशयास्पद खात्याप्रकरणी आता नवनवीन खुलासे होत असून पोलिस तपासाला वेग आला आहे. सोमवारी अपर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे व पोलिस निरीक्षक रणजित गलांडे यांनी सात खातेदारांची शुक्रवारी सखोल चौकशी केली. त्यात वरील खळबळजनक जबाब या खातेदारांनी नोंदविला आहे. २५ मे २०२१ रोजी एकाच दिवशी ही खाती उघडण्यात आली आहेत. राहाता येथील शाखेत ही खाती असली तरी खातेदार मात्र महाराष्ट्राच्या विविध भागांतील आहेत. चौकशीदरम्यान खातेदारांनी सांगितले की, संबंधित खात्यांसाठी आम्ही कोणतीही कागदपत्रे स्वतःहून दिली नाहीत. खात्यांवरील स्वाक्षरी आमची नाही. या खात्यात कधीही व्यवहार केलेले नाहीत. सध्या खात्यात असलेल्या रकमेवर आमचा कोणताही दावा नाही. मात्र, खाते उघडताना वापरलेली आधार कार्ड आणि पॅन कार्ड आमचीच असल्याचे त्यांनी पोलिसांसमोर मान्य केले. यामुळे संशयाची सुई कॅप्टन नावाच्या व्यक्तीकडे वळली आहे, जो या सर्व खात्यांचा वारसदार आहे. इतरांची कागदपत्रे वापरून त्यानेच ही खाती परस्पर उघडल्याचा प्राथमिक संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. महत्वाचे म्हणजे या खातेदारांना या खात्यावर काय व्यवहार चालू आहे हे न समजू देण्यासाठी त्याने स्वतः चा मोबाईल देऊन सर्व सुत्रे स्वतः हालवत होता . एकाच संस्थेत शेकडो खात्यासाठी एकच नॉमीनी ठेवून एकच मोबाईल नंबर नोंद करण्याची किमया या पतसंस्थानी साधल्याने संशयाची सुई त्याचे कडे वळत आहे. केवळ समता पतसंस्था पाठोपठ सिन्नरच्या जगदंबा पतसंस्थेत अशाच प्रकारचे संशयास्पद खाती आढळली आहेत. आतापर्यंत अनेक जणांची चौकशी झाली असून उर्वरित खातेदारांनाही लवकरच पाचारण करण्यात येणार आहे. या गुंतागुंतीच्या व्यवहारांबाबत पोलिस आता सहकार खात्याचे मार्गदर्शन घेणार आहेत. कागदपत्रांचा गैरवापर करून ही खाती कोणी उघडली आणि त्यामागील आर्थिक उद्देश काय होता? याचा शोध घेतला जाणार आहे. आणखी इतर पतसंस्थांमध्येही अशी खाती आहेत का याचा शोध पोलिस घेत आहेत.

## अंजुमभाई शेख यांचा स्विकृत नगरसेवक पदाचा राजीनामा

नगरपालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला रूळाच्या पलिकडील जास्तीत जास्त काँग्रेसच्या जागा निवडून आणण्यात अंजुम शेख यांचा सिंहाचा वाटा मानला जातो. यावेळेस मात्र अंजुम शेख हे निवडणूक रिंगणात उतरले नव्हते. परंतु पालिका निवडणुकीच्या घवघवीत यशात त्यांचा मोठा वाटा असल्याने काँग्रेस पक्षाने स्वीकृत नगरसेवक म्हणून त्यांची नियुक्ती केली होती.

## किरकोळ वादातून तरुणाचा खून

४ वाजण्याच्या सुमारास वळण गावातील असलेल्या दत्त मंदिरा जवळ किरकोळ वाद झाले त्यावेळी उद्धव खुळे याने काहीही मागचा पुढचा विचार न करता कृष्णा ऊर्फ दादा कुलट याच्यावर धारदार चाकूने वार केले. यावेळी काही स्थानिक नागरिकांनी कृष्णा ऊर्फ दादा कुलट याला ताबडतोब राहुरी येथील एका रुग्णालयात आणले. त्याची प्रकृती गंभीर असल्याने त्याला अहिल्यानगर येथील एका रुग्णालयात हलविण्यात आले. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी कृष्णा ऊर्फ दादा कुलट याला तपासून उपचारा पूर्वीच मयत झाला असल्याचे घोषित केले. यावेळी कृष्णा ऊर्फ दादा कुलट याचे मित्र व नातेवाईकांनी रुग्णालय परिसरात तसेच राहुरी पोलिस ठाण्याच्या आवारात मोठी गर्दी केली होती. तर घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांनी पोलिस पथकासह घटनास्थळी धाव घेतली.

**पढेगाव विका सेवा सहकारी संस्था मर्यादित पढेगाव**
ता.श्रीरामपूर जिल्हा अहिल्यानगर

**भंगार वस्तूंचा जाहीर लिलाव**

संस्थेच्या कार्याक्षेत्रातील तमाम इच्छुक खरीदिदारांना कळविण्यात येते कि पढेगाव ता–श्रीरामपूर यांचे जुने गोडाऊनचे भंगार साहित्याचा लिलाव दिनांक –०६/०४/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता वार– सोमवार संस्थेच्या कार्यालयातील जागेत होणार असुन इच्छुक खरेदीदारांनी/ बोलीधारकांनी लीलावास हजर राहून बोली करावी.

**–लिलावाच्या अटी व शर्ती–**

१) जे लिलावात भाग घेतील ते संस्थेच्या सभासद व पढेगाव ग्रामस्थ असावे त्यांची ओळखपत्र म्हणून आधार कार्ड सोबत असावे त्यानंतर इतर कोणी भाग घेतील तो निर्णय संचालक मंडळ घेईल. २) ज्या मतेदारांना / बोलीधारकांना लिलावात भाग घ्यावयाचा आहे त्यांनी संस्थेत रोख स्वरुपात रु ५०००/–जमा करणे बंधनकारक राहील ३) यशस्वी बोलीधारकाणे घेतलेला माल उचलण्यापूर्वी बोली रक्कम संस्थेच्या खात्यात अथवा चेक स्वरुपात देणे बंधनकारक राहील ४) कोणतेही कारण नमूद न करता लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम निर्णय संचालक मंडळाचा राहील ते सर्व निर्णय खरेदीदारांना बंधनकारक राहील. ५) मालाची रक्कम हि ५००००/– असुन त्यापुढे बोली सुरु करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**लिलावाचे साहित्य खालीलप्रमाणे**
**१) जुना पत्रा ८२ नग**
**२) लोखंडी गोल पाईप २ इंच ४० नग**
**३) लोखंडी कैची ३ नग इतर**
**संपर्क क्र. –९९७०४६००६९/९८८१३८१७६६**
**चेअरमन / व्हा. चेअरमन सर्व संचालक मंडळ सचिव**
पढेगाव वि.का. सेवा सहकारी संस्था मर्यादित पढेगाव

# गाझियाबादमध्ये राष्ट्रीय ड्रॉप रोबॉल स्पर्धेचा भव्य शुभारंभ

## किरीट सोलंकी यांना ‘हिंद गौरव विभूषण’

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गाझियाबाद** : देशभरातील खेळाडूंच्या उत्साहात १५वी सब–ज्युनियर व ज्युनियर तसेच १६वी सीनियर राष्ट्रीय ड्रॉप रोबॉल स्पर्धा येथे रंगतदार वातावरणात सुरू झाली आहे. स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी आयोजित सन्मान सोहळ्याने विशेष लक्ष वेधून घेतले.

या वेळी अहमदाबाद पश्चिम मतदारसंघाचे खासदार व वर्ल्ड ड्रॉप रोबॉल फेडरेशनचे अध्यक्ष किरीट सोलंकी यांना ‘हिंद गौरव विभूषण’ या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ड्रॉप रोबॉलचे संस्थापक डॉ. ईश्वरसिंह आचार्य यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला. क्रीडा व सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल यावेळी घेण्यात आली.




समाजसेवा क्षेत्रातील कार्यासाठी ‘उडान’ संस्थेचे सचिव अरुण कुमार यांचाही गौरव करण्यात आला. उत्तर प्रदेश ड्रॉप रोबॉल संघाचे अध्यक्ष अशोक यादव यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेत देशातील विविध राज्यांतील खेळाडूंनी सहभाग नोंदवला असून मैदानावर चुरशीचे सामने रंगत आहेत. खेळाडूंच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे प्रेक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. आयोजन समितीच्या माहितीनुसार, पुढील दिवसांत अधिक रोमांचक सामने पाहायला मिळणार आहेत.

ड्रॉप रोबॉलसारख्या उदयोन्मुख खेळाला राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून देण्यासाठी या स्पर्धेची महत्त्वपूर्ण भूमिका ठरत आहे. भारतीय ड्रॉप रोबॉलचे सचिव दत्ता गिरी गोसावी, विविध राज्यांचे पदाधिकारी व २३ राज्यांतील प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.


# निधन वार्ता

## राजूबाई जोशी



**श्रीरामपूर:** तालुक्यातील बेलापूर येथील राजूबाई रामदास जोशी (वय ७३) यांचे शुक्रवार दि.३ एप्रिल रोजी निधन झाले त्यांच्या पश्चात त्यांचे पती, एक मुलगी ,दोन मुले सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. प्रगतशील शेतकरी रामदास जोशी यांच्या त्या पत्नी होत.

## संध्या तांबे



**गोंडेगाव :** येथिल न्यु इंग्लिश स्कूल निमगांव खैरी सेवानिवृत्त शिक्षिका संध्या नारायणराव तांबे वय (६५) यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा ,एक मुलगी, पुतने नात नातू असा मोठा परिवार असून त्या युनियन बँक मुंबई शाखा मॅनेजर प्रसाद तांबे यांच्या मातोश्री होत्या.

# महात्मा गांधी विद्यालयास ५० लाखांची देणगी

## अमृत महोत्सवी वर्षाला मोठी मदत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** रयत शिक्षण संस्थेच्या प्रवरानगर येथील महात्मा गांधी विद्यालय, कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयास ५० लाख रुपयांची भरीव देणगी प्राप्त झाली आहे. रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी विद्यार्थी शरद पवार यांच्या प्रयत्नांतून ही देणगी उपलब्ध झाली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५–२६ हे संस्थेचे अमृत महोत्सवी वर्ष असून जून २०२६ मध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याच अनुषंगाने विद्यालयाच्या प्रगतीची माहिती प्राचार्य विनायक मेथवडे यांनी मुंबई येथे झालेल्या बैठकीत शरद पवार यांना दिली. या बैठकीस खासदार सुप्रिया सुळे, उपाध्यक्ष अरुण कडू,



मीनाताई जगधने, रावसाहेब म्हस्के आदी उपस्थित होते.

ारामती येथील ‘बारामती स्क्रॅप अँड वेस्ट मॅनेजमेंट प्रा. लि.’कडून ही देणगी मिळाली असून कंपनीचे प्रमुख नितीन धोंडे यांनी ५० लाखांचा धनादेश रावसाहेब म्हस्के व प्राचार्य मेथवडे यांच्याकडे सुपूर्द केला.

निधीतून विद्यालयाच्या गुणवत्तावाढीसह बहुउद्देशीय सभागृह उभारणीसाठी मदत होणार आहे. यापूर्वीही शरद पवार यांनी विद्यार्थ्यांसाठी विशेष गुणवत्ता शिष्यवृत्ती सुरू केली आहे.

ही देणगी मिळविण्यासाठी माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष रावसाहेब म्हस्के, उपाध्यक्ष अरुण कडू, एकनाथराव घोगरे व प्राचार्य मेथवडे यांनी विशेष प्रयत्न केले. या उपक्रमासाठी माजी विद्यार्थ्यांकडूनही मोठा प्रतिसाद मिळत आहे.

# शनिशिंगणापुरात भाविकांची उसळलेली गर्दी

## सुरळीत व्यवस्थेमुळे समाधानाने दर्शन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** कडक उन्हाच्या पार्श्वभूमीवर शनिशिंगणापूर येथे शनिदर्शनासाठी भाविकांची अचानक मोठी गर्दी उसळली. देशाच्या कानाकोपऱ्यातून तसेच परिसरातील हजारो भक्तांनी मंदिरात हजेरी लावत ‘जय शनिदेव’च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

मंदिर परिसरात सुवासिक अगरबत्ती व फुलांच्या सुगंधात भक्तांनी शांततेत व भक्तिभावाने दर्शन घेतले. स्वच्छतेची विशेष काळजी घेतल्याचे चित्रही यावेळी पाहायला मिळाले. यापूर्वी वाहतूक कोंडी, लूटमार व पोलिस त्रासामुळे नाराजी होती. मात्र, देवस्थानचे प्रशासक डॉ. प्रवीण गेडाम यांनी कडक व्यवस्थापन राबवल्याने मागील काही दिवसांत भाविकांना कोणताही त्रास न होता समाधानाने दर्शन घेता आले.



कार्यकारी अधिकारी अतुल चोरमारे, पोलीस निरीक्षक आशिष शेळके व अन्य सदस्यांनी भाविकांचे स्वागत व व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळली. दिवसभर उन्हाचा कडाका असतानाही देवस्थान परिसरातील पार्किंग पूर्णपणे भरले होते. नव्या व्यवस्थेमुळे भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती समितीच्या अध्यक्षपदी नितीन गायकवाड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील प्रवरासंगम येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती समितीच्या अध्यक्षपदी युवा कार्यकर्ते नितीन गायकवाड यांची निवड सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. यावेळी झालेल्या बैठकीच्या प्रसंगी संतोष मोरे,अमोल पारखे,अमोल पंडित,नवनाथ चाबुकस्वार,बाळासाहेब पवार,बाबासाहेब भालेराव,चंद्रकांत गायकवाड,सुधीर पारखे,राज फासगे,नितीन भालेराव,गजानन शेलार,दगडू गायकवाड,दादासाहेब गायकवाड,रिपब्लिक सेनेचे जिल्हाध्यक्ष सोमनाथ साठे,सोमनाथ गायकवाड उपस्थित होते.महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती सर्वधर्मीय बांधवांना बरोबर घेऊन साजरी करण्याचा आपला प्रयत्न असून शिस्तबद्ध मिरवणूक काढून विविध उपक्रमांनी जयंती साजरी करणार असल्याचे निवडीनंतर समितीचे अध्यक्ष नितीन गायकवाड यांनी सांगितले.



# विनयभंगप्रकरणी एकास सक्तमजुरीची शिक्षा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** घरात घुसून महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी तालुक्यातील टाकळीभान येथील अशोक नारायण शेंडे याला न्यायालयाने एक वर्ष सक्तमजुरी व ४ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली. याशिवाय, फिर्यादीस नुकसानभरपाई देण्याचेही आदेश देण्यात आले आहेत.



दि.१४ जून २०२३ रोजी फिर्यादी महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, अशोक शेंडे याने तिच्या घरात अनधिकृत प्रवेश करून तू मला फार आवडतेस, असे म्हणत लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. तसेच तोंड बंद ठेव, नाहीतर तुझ्या नवऱ्याला व मुलाला सोडणार नाही, अशी धमकी देत शिवीगाळ केली. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल एम. के. शेलार व पो.कॉ कांबळे यांनी तपास पूर्ण करून वेळेत दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले. सरकारी बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी सहाय्यक सरकारी अभियोक्ता महाडेश्वर तसेच महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल कांचन पंडित, लावरे आणि पोलीस कॉन्स्टेबल चव्हाण यांनी काम पाहिले. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. १, जाधव यांनी साक्षीदारांचा तपास करून आरोपीस एक वर्ष सक्तमजुरी, सहा हजार रुपये दंड तसेच कलम ३५४ अंतर्गत एक वर्ष सक्तमजुरी व चार हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली. याशिवाय, फिर्यादीस नुकसानभरपाई देण्याचेही आदेश देण्यात आले आहेत.

# फुले कृषी विद्यापीठ व सह्याद्री फार्म्स यांच्यात सामंजस्य करार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** शैक्षणिक संशोधन आणि खाजगी कृषी उद्योग यांतील दरी कमी करून मूल्य साखळी बळकटीच्या दृष्टीने महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी आणि सह्याद्री फार्म्स यांच्यात महत्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. हा करार नाशिक जिल्ह्यातील मोहाडी येथील सह्याद्री फार्म्स मुख्यालयात कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. सामंजस्य करारावर कृषी विद्यापीठाच्या वतीने संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांनी तर सह्याद्री फार्म्सच्या वतीने सह्याद्री फार्म्सचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विलास शिंदे यांनी स्वाक्षऱ्या केल्या.




याप्रसंगी कुलगुरू डॉ. विलास खर्चे मार्गदर्शन करताना म्हणाले, ‘‘या सामंजस्य करारांतर्गत संयुक्त संशोधन, विस्तार सेवा व प्रगत प्रशिक्षण उपक्रम राबवून संपूर्ण कृषी मूल्य साखळी बळकट करण्यावर भर दिला जाणार आहे. राहुरी कृषी विद्यापीठाच्या शैक्षणिक व संशोधन कौशल्याचा आणि सह्याद्री फार्म्सच्या व्यापक शेतकरी जाळ्याचा लाभ घेत, शेतकऱ्यांसाठी परिणामकारक व प्रत्यक्ष उपयोगी नवकल्पना विकसित करण्याचे उद्दिष्ट आहे.’’ या करारामुळे कृषीच्या विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न मिळता, प्रत्यक्ष उद्योगाचा अनुभव मिळणार आहे. विद्यापीठातील पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना सह्याद्री फार्म्सच्या अत्याधुनिक प्रक्रिया केंद्रांमध्ये काम करण्याची संधी मिळेल. यामुळे त्यांना काढणीपश्चात तंत्रज्ञान, निर्यात दर्जाचे व्यवस्थापन आणि पुरवठा साखळीचे प्रत्यक्ष प्रशिक्षण मिळेल.ज्या विद्यार्थ्यांना स्वतःचा कृषी उद्योग सुरू करायचा आहे, त्यांच्यासाठी सह्याद्री फार्म्स आणि विद्यापीठाच्या 'इन्क्युबेशन सेंटर'च्या माध्यमातून विशेष मार्गदर्शन दिले जाईल. यामुळे नोकरी शोधणाऱ्या विद्यार्थ्यांऐवजी रोजगार निर्माण करणारे नवे 'कृषी उद्योजक' घडण्यास मोठी मदत होईल.शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीच्या दृष्टीने हा करार एक मैलाचा दगड ठरणार आहे. विद्यापीठाच्या संशोधनातून विकसित झालेले प्रगत तंत्रज्ञान थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचेल. या तंत्रज्ञानाच्या साथीने पिकवलेल्या दर्जेदार शेतमालाला सह्याद्री फार्म्सच्या माध्यमातून थेट जागतिक आणि देशांतर्गत बाजारपेठेशी जोडले जाईल. काढणीपश्चात होणारे नुकसान कमी करण्यासाठी योग्य तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. शेतमालावर प्रक्रिया करून तो विकल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला जास्तीत जास्त व रास्त भाव मिळून त्यांच्या उत्पन्नात शाश्वत आणि भरीव वाढ होईल. याप्रसंगी राहुरी विद्यापीठाचे अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड, निफाड येथील कृषी संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. भालचंद्र मस्के, सह्याद्री फार्म्सचे संचालक मंगेश भास्कर, गणेश कदम, एच–स्केअर इन्क्युबेशन सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद राजेभोसले तसेच डिजिटल इम्पॅक्ट स्केअरचे नवोपक्रम व उद्योजकता प्रमुख संदीप शिंदे उपस्थित होते.

# काकडवाडीत पाणीटंचाई ; आ. खताळ यांच्या माध्यमातून दररोज टँकर सुरू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** तालुक्यातील काकडवाडी गावात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाल्याने आमदार अमोल खताळ यांच्या माध्यमातून दररोज पिण्याच्या पाण्याचा टँकर सुरू करण्यात आला आहे. या निर्णयामुळे ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.

उन्हाळ्याची तीव्रता वाढल्याने गावातील विहिरी व बोअरवेल कोरड्या पडू लागल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. ही बाब लक्षात घेऊन स्थानिक पत्रकार व महायुतीच्या कार्यकर्त्यांनी आमदार खताळ यांच्याकडे टँकर सुरू करण्याची मागणी केली होती.

मागणीची तातडी ओळखून जनसेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्वरित टँकर सुरू करण्यात आला असून पावसाळा सुरू होईपर्यंत ही सेवा नियमित सुरू राहणार असल्याची माहिती देण्यात आली. टँकरमुळे महिलांची पाण्यासाठी होणारी धावपळ मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे.

दरम्यान, नागरिकांच्या विविध समस्या तातडीने सोडविण्यासाठी आमदार खताळ सक्रिय असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. एका फोनवर प्रश्न मार्गी लावणारे आमदार अशी त्यांची ओळख निर्माण होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

# टाकळीमियात हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील टाकळीमिया येथे सकल हिंदू समाज व ग्रामस्थांच्या वतीने हनुमान जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तीभावाने साजरा करण्यात आला.

या निमित्ताने भजनी मंडळांनी रात्रभर भजन –कीर्तनाचा जागर केला. पहाटे सहा वाजता हनुमान जन्मोत्सव मोठ्या आनंदात साजरा झाला. त्यानंतर सकाळी सात वाजता गंगाजल आणण्यासाठी गेलेल्या कावडधारकांचे व गंगाजलाचे पूजन करण्यात आले.

यानंतर कावड यात्रेची गावातून वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक हनुमान मंदिरात पोहोचल्यानंतर हनुमान मूर्तीला जलाभिषेक करून पूजा करण्यात आली. यानंतर उपस्थित भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.



श्री हनुमंत रायांच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. दरम्यान, रात्री 'केरळा २' हा चित्रपट दाखवण्याचे आयोजन करण्यात आले होते, मात्र जोरदार पाऊस व गारपिटीमुळे तो कार्यक्रम रद्द करण्यात आला. हनुमान जन्मोत्सवानिमित्त मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती तसेच फुलांची सुंदर सजावटही करण्यात आली होती. सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सकल हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## नशिबाची परिक्षा

**रविवार दि .०५ एप्रिल २०२६**

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १९०<br>२३५<br>४६० | ०-३ | १२०<br>३४६<br>४९० | जोड<br>०७-१३-२९<br>६८-३५ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १२४<br>४६७<br>१३३ | ७-४ | १४९<br>२४८<br>७७० | जोड<br>७६-३४-२१-<br>५९-४८ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १७९<br>२७८<br>३७७ | ७-० | १४५<br>२३५<br>५५० | जोड<br>७२-३०-१८<br>४५-०९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

द•ख•ल



## संकष्टीनिमित्त आव्हाणे येथे विविध धार्मिक कार्यक्रम

**ढोरजळगांव :** शेवगाव तालुक्यातील आव्हाणे बु येथील श्री गणपती मंदिर टस्ट येथे रविवार दि ५ एप्रिल रोजी संकष्टीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ७ वा पैठण वरून आणलेल्या गंगेच्या पाण्याने श्रीची आरती व महाभिषेक श्यामसुंदर कुलकर्णी,बप्पासाहेब वाणी यांच्या हस्ते होणार असून दुपारी १२ वाजता भाविकांना फराळाची व्यवस्था कुलकर्णी व वाणी यांच्यावतीने करण्यात आली आहे. सायं ६ वा हभप उध्दव महाराज जाधव यांचे प्रवचन होईल.सायं ७ वा श्रीची अरती व महाभिषेक डॉ संदिप आहेर यांच्या हस्ते होणार आहे. रात्री ९ वा भाविक भक्तासाठी महाप्रसादाची व्यवस्था आहेर यांच्यावतीने करण्यात आली . आहे.रात्री दहा वाजता दादोबा देव एकतारी भजनी मंडळाचा जागराचा कार्यक्रम होईल. तरी या धार्मिक कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा,असे आवाहन निद्रिस्त गणपती मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष प्रा.म ालोजीराव भुसारी , सरचिटणीस अर्जुनराव सरपते, कार्यालयीन सचिव लक्ष्मणराव मुटकुळे व माजी विश्वस्त अंकुश कळमकर,रामदास दिवटे,कारभारी तळेकर,नारायण जाधव यांनी केले आहे.

## शिर्डीच्या उर्दू हायस्कूलला आ.दराडेंकडून डिजिटल प्रोजेक्टर



**लिंपणगाव :** शिर्डी येथे नाशिक विभागाचे शिक्षक आमदार श्री किशोर भाऊ दराडे यांच्या आमदार स्थानिक विकास निधीतून शिर्डी उर्दू एज्युकेशन सोसायटी संचलित शिर्डी उर्दू हायस्कूल या शाळेतील विद्यार्थ्यांना डिजिटल प्रोजेक्टर आमदार किशोर भाऊ दराडे यांचे स्वीय सहाय्यक श्री हरीश जी मुंडे , श्री अनर्थे सर यांच्या हस्ते भेट म्हणून देण्यात आले. या पूर्वीही आमदार साहेबांच्या निधीतून शाळेस संगणक संच व इतर साहित्य स्वरूपात मदत म्हणून देण्यात आली आहे ,शाळेचे संस्थापकीय अध्यक्ष हाजी नसिर भाई दारूवाले श्री शौकतभाई सय्यद यांनी संस्थेच्या वतीने आभार मानले, या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री पठाण आर,एम, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व इतर मान्यवर उपस्थित होते.

## शहरासाठी व्हिजन असणे महत्त्वाचे : उपमहापौर जाधव

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महानगरपालिकेत सर्वानुमते उपमहापौरपदी निवड झाल्याबद्दल हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात धनंजय जाधव यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना जाधव यांनी अहिल्यानगर शहराच्या विकासासाठी सदैव तत्पर असून पुढील काही वर्षाचे व्हिजन समोर ठेवून आम्ही सर्वजण काम करणार आहोत. शहराचा विकास हा एकमेव हेतू डोळ्यासमोर ठेवून शहरवासीयांच्या प्राथमिक गरजांसोबत शहरात तरुणांना समोर ठेवून नाविन्यपूर्ण उद्योग आणि उपक्रम राबविण्याचा मानस असल्याचे सांगितले. सर्वांना सोबत घेऊन केवळ नगर विकास हाच एक ध्यास मनाशी बाळगून हे पद स्वीकारल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. या प्रसंगी त्यांनी विद्यालयाच्या ख कम्प्युटर लॅब ला भेट दिली. नव्याने नूतनीकरण करून सुरू करण्यात आलेल्या कम्प्युटर लॅबचे आणि विद्यार्थ्यांनी तयार केलेली विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणे पाहताना उपमहापौर धनंजय जाधव यांनी ए आय हे भविष्य असून, शिक्षण क्षेत्रात ए. आय. चा उपयोग अत्यंत म हत्त्वाचा असणार आहे. यासाठी शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांना या प्रशिक्षणामुळे त्यांचे करिअर आणि भविष्य हे नक्कीच उज्वल असेल असे प्रतिपादन केले.

# कुकडीच्या आवर्तन कालावधीत दोन कर्मचारी प्रचंड तणावाखाली

## आवर्तन कालावधीत पोलीस बंदोबस्त वाढवा; १३२ मायनरवर दोन कर्मचाऱ्यांवर हल्ले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यात १३२ मायनर मधून कुकडीचे आवर्तन सुरू आहे. सदरचे आवर्तन हे १९ मार्च रोजी या कुकडी कालव्यातून घारगाव बेलवंडीच्या परिसरातून श्रीगोंदेकरांसाठी कुकडीचे उन्हाळी आवर्तन सोडण्यात आले. मात्र आवर्तन कालावधीत या कालव्यावर फक्त दोनच कर्मचारी शेवटच्या शेतकऱ्याला पाणी मिळण्यासाठी मेहनत व कसरत घेत आहेत. रात्रंदिवस खडा पहारा ठेवून अनेक शेतकऱ्यांचे व पाणी वापर संस्थांचे शिव्यांची लाखोरी व हल्ले अंगावर घेऊन हे दोन सैनिक आवर्तनासाठी लढतात.

या मायनर वरती असणाऱ्या पाणी वापर संस्थांच्या पदाधिकाऱ्यांकडून जास्तीच्या पाण्यासाठी दबावतंत्र वापरले जात असल्याने सदर कार्यरत असलेले दोन कर्मचारी प्रामुख्याने एक सहाय्यक अभियंता तर एक दप्तर कारकून हे प्रचंड तणावाखाली आहेत. वास्तविक पाहता विसापूर सिंचन चे उपविभागीय अधिकारी यांनी आवर्तन कालावधीत कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या लक्षात घेता इतर सिंचन विभागातील कर्मचाऱ्यांची आवर्तन कालावधीत



तात्पुरती नेमणूक करणे गरजेचे आहे. परंतु याबाबत संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांनी या कालव्यावरती साफ दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पाणी वापर संस्थांचे पदाधिकारी व संबंधित कुकडीचे कर्मचारी यांच्यामध्ये तुफान वादंग होत असल्याचे समजते. त्यातून चाऱ्या बंद करण्यासाठी वापरण्यात आलेल्या जेसीपी वर देखील दगडफेक केली जात आहे अशा वातावरणात हे आवर्तन कसे पूर्ण करावे असा पेच या दोन कर्मचाऱ्यांकडे सध्या उभा असल्याचे समजते.

दरम्यान या जलसंपदा विभागाच्या कुकडी पाटबंधारे विभागात अनेक कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत, काही मयत झाले, त्यामुळे या कुकडी बंधारे विभागात अनेक पदांचा तुटवडा दिसतो आहे. यापूर्वी २३ कर्मचारी कार्यरत होते. आता फक्त तीनच कर्मचारी या कालव्या वरती कार्यरत असल्याने त्यांच्यावर प्रचंड ताण येत असल्याचे कर्मचारी वर्गातून समजले. वास्तविक पाहता कुकडीचे कार्यकारी अभियंता व विसापूर जलसिंचन चे उपविभागीय अधिकारी यांनी आवर्तन कालावधीत अपुरा कर्मचारी वर्ग लक्षात घेता त्यांना बंदोबस्तासाठी आवर्तन कालावधीत पोलीस निरीक्षकांना पत्र देऊन पोलीस बंदोबस्त देण्याची आवश्यकता होती. त्याची देखील पूर्तता केली जात नाही. असे देखील सम जते. अपुरी कर्मचारी संख्या लक्षात घेता स्वतः लक्ष घालून या १३२ मायनर वरती कार्यरत असणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांना आधार देणे, अगर कर्मचारी संख्या वाढवणे हे त्यांचे कर्तव्य आहे. परंतु या कर्मचाऱ्यांना आधार तर कर्तव्य तर सोडाच परंतु अक्षरशा या कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांवर व त्यांच्या वाहनांवर पाणी वापर संस्थांचे पदाधिकारी धावून येत दगडांचा वर्षाव करतात. त्यामुळे त्यांच्या जीविताला धोक असल्याचे देखील बाब समोर आली आहे.

दरम्यान गेल्या दोन ते तीन दिवसांमध्ये या दोन्हीही कर्मचाऱ्यांनी आवर्तन कालावधीत श्रीगोंदा पोलिसात शासकीय कामात अडथळा आणल्याबद्दल संबंधित पाणी वापर संस्थांच्या विरोधात तक्रार दाखल केली. परंतु तेथेही पोलिसांनी दखल घेतली नसल्याचे समजते. कारण पाणी वापर संस्थांचे पदाधिकारी हे तालुक्यातील मोठ्या नेत्यांचे हस्तक असल्याने हा प्रकार घडला जात असून कर्मचाऱ्यांचे आवर्तन कालावधीत मानसिक संतुलन देखील बिघडल्याचे समजते कशी चर्चा देखील कर्मचारी वर्गात होताना दिसत आहे.

## कुस्त्याच्या जंगी हगाम्याने हातगावातील श्रीलक्ष्मी देवीच्या यात्रेची सांगता



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील हातगाव येथील ग्रामस्थांचे श्रद्धास्थान सम जल्या जाणाऱ्या व शेकडो वर्षापासून भरत आलेल्या श्री लक्ष्मीदेवी यात्रेचा उत्सव म ोठ्या उत्साहात पार पडला असून कुस्त्याच्या जंगी हगामाने यात्रेची सांगता झाली आहे.

या यात्रेसाठी मुंबई, पुणे,संभाजीनगर, कल्याण आदी ठिकाणी आपल्या कुटुंबासह जाऊन राहत असलेले असंख्य गावातील भाविक - भक्त प्रत्येक वर्षी येऊन देवीला बोललेला नवस फेडून समाधानाने परतत असतात प्रत्येक वर्षी हनुमान जयंतीच्या दुसऱ्या दिवशी चैत्र पौर्णिमेच्या यात्रेला या यात्रेची सुरुवात होऊन विविध कार्यक्रमाच्या आयोजनाने यात्रा सर्व ग्रामस्थांच्या उपस्थितीत साजरी होत आहे. गेली ३ वर्षापासून प्रत्येक वर्षी भरणाऱ्या या यात्रेच्या वेळी निसर्गाच्या अवकृपेमुळे आकाशातील ढगाळ वातावरणाम ुळे यात्रेवर अवकाळी पावसाचे सावट राहत असल्याने सुद्धा भाविक - भक्त दूरवरून येऊन आपली हजेरी लाऊन जात आहेत. या वेळी यात्रेत जो हगामा पार पडला आहे तो मंदिरासमोरील असणाऱ्या आखाड्यांम ध्ये शेकडो नागरिकाच्या उपस्थितीत पार पडला आहे. उपस्थित असलेल्या असंख्य मल्लांनी कुस्ती खेळून आपला शोक साजरा केला असून नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात मल्लांना देणगीही मिळाली असल्याने अनेक मल्ल पुढच्या वर्षी पुन्हा निश्चितपणे हजेरी लाऊ असे सांगत होते.

# राहुरी मतदारसंघातून महाविकास आघाडीचा उमेदवार देणार : काकडे

## सार्वजनिक व सामाजिक कार्याचा अजेंडा पुढे नेणार : निलेश लंके

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक पक्ष कार्यालयात प्रदेश उपाध्यक्ष तथा पक्षनिरीक्षक अंकुशराव काकडे यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडली.

यावेळी खासदार निलेश लंके, दक्षिण जिल्हाध्यक्ष दादाभाऊ कळमकर, उत्तर जिल्हाध्यक्ष संदीप वर्पे, रावसाहेब मस्के, अरुण पाटील कडू, बाबासाहेब भोस, राजेंद्र कोठारी, अशोक बाबर, योगिता राजळे, नामदेव राऊत, सिताराम काकडे, किसनराव लोटके, अथर खान, निलेश मालपाणी, बापूसाहेब रांधवणे, सुरेश गडाख, विजयसिंह गोलेकर, रघुआबा काळदाते, शौकत तांबोळी, विनोद साळवे, हरिदास शिर्के, बाळासाहेब हराळ, शरद पवार, हरीश भारदे, शिवशंकर राजळे,फारुक रंगरेज, बाळासाहेब भांगरे, सुरेश खांडगे, रमेश गव्हाणे, अशोक बागुल, लकी सेठी, चंद्रकांत घुले, शशिकांत लोळगे यांचेसह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीत सर्व तालुका अध्यक्ष, नवनिर्वाचित नगरसेवक व कार्यकर्त्यांनी आपापले मनोगत व्यक्त करत पक्षाच्या पुढील वाटचालीसाठी विविध उपाययोजना व आंदोलनाची रणनीती मांडली. पक्ष बळकट करण्यासाठी कार्यकर्त्यांना सक्षम पाठबळ



देणे गरजेचे असून, आलेली मरगळ एकजुटीने दूर करून नव्या जोमाने लढा उभारण्याची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

यावेळी खासदार निलेश लंके म्हणाले की, तालुका अध्यक्षांनी मांडलेले मुद्दे हे प्रत्यक्ष ग्राउंड रिपोर्टवर आधारित आहेत.

सत्ताधाऱ्यांकडून खोटे गुन्हे दाखल करून विरोधकांना त्रास देण्याचे प्रकार वाढले आहेत. सार्वजनिक व सामाजिक कार्याचा अजेंडा पुढे घेऊनच सर्वांनी वाटचाल करावी, असेही त्यांनी नमूद केले. लवकरच प्रत्येक तालुक्यात पक्ष कार्यालय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. कोणत्याही अडचणीत कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रदेश उपाध्यक्ष तथा पक्षनिरीक्षक अंकुशराव काकडे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, आपण सर्वजण शरदचंद्र पवार यांच्या विचारांवर चालणारे आहोत. पक्ष फुटल्यामुळे ताकद कमी झाली असली, तरी उरलेले कार्यकर्ते हेच खरे बळ आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महाविकास आघाडीसोबत लढवण्यात आल्या असून, आता संघटन वाढीसाठी अधिक प्रयत्न करणे आवश्यक आहे.मे महिन्यात सलग सात दिवस तालुका बैठका घेऊन संघटन मजबूत करण्यात येणार असून महिला, विद्यार्थी व युवक संघटनांवर विशेष भर दिला जाणार आहे.

उत्तर जिल्हाध्यक्ष संदीप वर्पे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, पक्षाची ताकद ही तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये आहे. प्रत्येक गावात संघटन पोहोचवून नव्या कार्यकर्त्यांना संधी देणे आवश्यक आहे. दक्षिण कार्याध्यक्ष सीताराम काकडे यांनी प्रास्ताविक केले तर अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष अथर खान यांनी आभार मानले.

# प्रयत्नांना यशाची खाकी वर्दी!

## रामेश्वर सोनवणे यांची महाराष्ट्र पोलीस दलात दिमाखदार निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** शून्यातून विश्व निर्माण करण्याची जिद्द आणि अंगात सळसळणारे कसब असेल, तर यशाचे शिखर दूर नसते. हेच सिद्ध करून दाखवले आहे रामेश्वर गणपत सोनवणे या तरुणाने. पिंपरी-चिंचवड पोलीस भरती प्रक्रियेत रामेश्वरने आपल्या कौशल्याचा असा काही ठसा उम टवला की, निकालाच्या यादीत थेट अनुसूचित जाती प्रवर्गातून तिसरा क्रमांक पटकावत त्याने वर्दीचे स्वप्न पूर्ण केले.

गणेश याने एकूण गुण: १५० पैकी १३३ (उत्तुंग यश!)तो प्रवर्ग: अनुसूचित जाती मधून संपूर्ण प्रवर्गात ३ रा क्रमांक पटकावला आहे. त्याचा शैक्षणिक प्रवास ग्रामीण भागातून सुरू झाला सोनवने वस्तीवरील जि. प. शाळा ते पोलीस अॅकॅडमी पर्यंत मोठा कठीण रामेश्वर यांचा हा प्रवास सोपा नव्हता. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद सोनवने वस्ती शाळेतून सुरू झालेली ही वाटचाल आज पोलीस दलाच्या मुख्य प्रवाहात येऊन पोहोचली आहे:त्याचे प्राथमिक शिक्षण: जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सोनवणे वस्ती१ ली ते ४ थी माध्यमिक व उच्च माध्यमिक: विद्याधाम प्रशाला, शिक्रापूर (५ वी ते १२ वी).येथे झाले आहे त्याच्या यशाचा 'सिक्रेट' फॉर्म्युला म्हणजे रामेश्वरच्या या यशात मेहनतीसोबतच योग्य मार्गदर्शनाचा मोठा वाटा आहे. पिंपरी-चिंचवडमधील 'द डिफेन्स अकादमी' आणि बालाजीनगरम धील 'शिवचैतन्य अकादमी' यांनी दिलेल्या ट्रेनिंगमुळे मैदानी आणि लेखी परीक्षेत त्याने बाजी मारली.आहे ते बोलताना म्हणाले की माझ्या यशाचे सर्व श्रेय आई-वडिलांना जाते. त्यांच्या कष्टाची जाण आणि मार्गदर्शकांचा विश्वास यामुळेच आज मी ही वर्दी मिळवू शकलो, अशा भावना रामेश्वरने निवडीनंतर व्यक्त केल्या.

**युवकांसाठी एक नवा आदर्श :** ग्रामीण भागातील मातीशी नातं सांगणारा हा तरुण जेव्हा पोलीस दलात दाखल होतो, तेव्हा तो केवळ एक कर्मचारी नसून हजारो तरुणांसाठी आशेचा किरण ठरतो. बॅकग्राउंड नाही, तर बॅकबोन (मेहनत) मजबूत हवी हाच संदेश रामेश्वरच्या या निवडीतून मिळतो,असेही बोलले जात होते.

# काष्टीत महावीर जन्म कल्याणक महोत्सव उत्साहात साजरा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** काष्टी येथे महावीर जन्म कल्याणक महोत्सव दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. या उत्सवात काष्टीतील जैन बांधवांसह महिला वर्गाने मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

यावेळी जैन स्थानकापासून भगवान म हावीरांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. ही शोभायात्रा गावातील प्रमुख म ार्गांवरून फिरत भैरवनाथ चौकात पोहोचली.

येथे माजी सभापती अरुणराव पाचपुते, लक्ष्मण अण्णा नलगे, सुभाष तात्या पाचपुते, माऊली काका कुलकर्णी, वसंत आप्पा पालकर, नवनाथ राहींज, सुनील तात्या दरेकर, बाळासाहेब पाचपुते, गुलाब भाई तांबोळी आदी मान्यवरांच्या हस्ते भगवान महावीरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी चौकात जैन बांधवांच्या वतीने गरबा नृत्य सादर करण्यात आले, ज्यामुळे वातावरणात उत्साहाचे रंग भरले. त्यानंतर कार्यक्रम जैन स्थानकात पार पडला. येथे लहान मुलांच्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमासाठी परिक्रमा संस्थेच्या अध्यक्षा प्रतिभाताई पाचपुते तसेच निवृत्त पोलीस अधीक्षक संजयजी सातव उपस्थित होते. तसेच श्री पारसमलजी बाटिया यांनी व्याख्यानातून भगवान महावीरांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या सांगतेनंतर जैन श्रावक संघाच्या वतीने गौतम प्रसादीचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवासाठी धनराजजी बोगावत, संजयजी पटवा, प्रवीणजी कटारिया, गौरवजी कटारिया, आशिषजी मुनोत, महावीरजी मुनोत, चंदनजी मुनोत, संजयजी मुनोत, मनोजजी मुनोत, प्रीतमजी मांडोत आदींचे सहकार्य लाभले. महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. मंगलबाई बोगावत यांच्यासह मोठ्या संख्येने महिला वर्गाची उपस्थिती या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरली.

# पाथर्डीत बळीराजावर 'आसमानी' संकट, आंबा हंगामही धोक्यात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** चैत्र पडे, अन कुणबी रडे ही ग्रामीण भागातली म्हण यंदा अक्षरशः खरी ठरताना दिसत आहे. चैत्र महिन्यात अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने पाथर्डी तालुक्यातील शेतकऱ्यांचे अक्षरशः कंबरडे म ोडले आहे. गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसासह गारपीटीमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून बळीराजा हतबल झाला आहे.

एका बाजूला शेतमालाला भाव नाही, तर दुसऱ्या बाजूला वाढती महागाई शेतकऱ्यांच्या जिवावर बेतत आहे. जगायचे तरी कसे? हा प्रश्न आता केवळ शेतकऱ्यांचाच नव्हे, तर सर्वसामान्य नागरिकांचाही झाला आहे. निसर्गचक्र कोपल्याने ग्रामीण भागातील उत्साह हरपला असून यात्रा-जत्रा, हरिनाम सप्ताह यांनाही पूर्वीसारखा प्रतिसाद मिळत नाही.

अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका फळबागांना बसला आहे. पाथर्डी तालुका केशर व गावरान आंब्याच्या उत्पादनासाठी ओळखला जातो. मात्र यंदा आंबा हंगामावरच संकट कोसळले आहे. शेतकऱ्यांची चालती-बोलती बँक समजला जाणारा आंबा हंगाम उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. अर्धवट वाढलेल्या कैऱ्या बाजारात विक्रीसाठी येत असून, यंदाचा आंबा सीझन कितपत साधेल, याबाबत शेतकऱ्यांमध्ये मोठी चिंता व्यक्त होत आहे.






भाजीपाला अक्षरशः चिखलात लोळत असून कांदे पाण्यात सडत आहेत, तर काढणीला आलेला गहू भिजून खराब झाला आहे. मक्याचे पीकही पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे. बाजारात मेथी, कोथिंबीर, पालक यांसारख्या भाज्या पाच-दहा रुपयांत विकल्या जात असल्या तरी त्यामागे शेतकऱ्यांची हतबलता दडलेली आहे. वाहतूक खर्च, बाजार समितीचे शुल्क भरल्यानंतर शेतकऱ्यांच्या हातात काहीच उरत नाही. दिवसभर उन्हात बसून माल विकल्यानंतरही रिकाम्या हाताने घरी परतण्याची वेळ अनेकांवर आली आहे.

घरात लहान मुले खाऊची अपेक्षा करत वाट पाहत असतात, मात्र वडीलधाऱ्यांच्या रिकाम्या हातांकडे पाहून तीही शांतपणे निघून जातातही परिस्थिती शेतकऱ्यांच्या वेदनेचे जिवंत चित्र उभे करते.

दरम्यान, नुकसानीचे पंचनामे करण्याच्या घोषणा प्रशासनाकडून करण्यात आल्या असल्या तरी प्रत्यक्ष मदत कधी आणि किती मिळणार, याबाबत कोणतीही ठोस हमी नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

यंदा उसाचा हंगामही समाधानकारक राहिला नाही. हार्वेस्टर मशीनमुळे कामगारांना रोजगार कमी मिळाला, तर उसाचे उत्पादन घटण्याची शक्यता वर्तवली जात आहे. चाऱ्यासाठी उसाची विक्री वाढेल, अशीही शक्यता व्यक्त केली जात आहे.

चैत्रातील पाऊस शेतीसाठी विषारी म ानला जातो. या पावसामुळे जमिनीची उष्णता टिकत नाही, परिणामी मशागतीची कामे उशिरा होतात आणि उत्पादनक्षमतेवर परिणाम होतो. त्यामुळे आगामी खरीप हंगाम ाबाबतही शेतकऱ्यांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण आहे.

बाजारपेठेची स्थितीही चिंताजनक आहे. ग्राहक खरेदीसाठी पुढे येत नाहीत, तर महागाई आटोक्यात येत नाही. फळांना मागणी नसल्याने कलिंगड, खरबूज, चिकू, मोसंबी यांसारखी फळे अत्यल्प दरात विकली जात आहेत. फळ विक्रेत्यांनाही कर्ज फेडणे कठीण झाले आहे.

तालुक्यातील काही भागात पाणीटंचाईची चाहूल लागली असून माणिकदौंडी सारख्या डोंगराळ भागात पाण्याची पातळी झपाट्याने घसरत आहे. दुसरीकडे अवैध सावकारी, गुन्हेगारी आणि आर्थिक ताणतणावामुळे सामाजिक परिस्थिती अधिकच तणावग्रस्त बनत आहे.

राजकीय पातळीवरही अनिश्चिततेचे वातावरण असून सर्वसामान्य नागरिकांना प्रशासनाकडून ठोस आधार मिळत नसल्याची भावना व्यक्त होत आहे. जागतिक घडामोडी, युद्धाची शक्यता आणि त्याचे आर्थिक परिणाम यामुळे सर्वच स्तरांवर चिंतेचे वातावरण आहे.

अशा या सर्व संकटांच्या पार्श्वभूमीवर पाथर्डी तालुक्यातील शेतकरी आधीच खल्लास, त्यात धोंड्याचा मास अशा अवस्थेत सापडला आहे. आगामी काळ अधिक कठीण असण्याची चिन्हे दिसत असून, या संकटातून बाहेर पडण्यासाठी शासन, प्रशासन आणि समाजाने एकत्र येत शेतकऱ्यांना आधार देण्याची गरज निर्माण झाली आहे.

द•ख•ल

## मु.सा काकडे महाविद्यालयातील सय्यद आलीची राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड



**सोमेश्वरनगर**- शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी, पुणे येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय जूनियर कुस्ती स्पर्धेमध्ये मु.सा काकडे महाविद्यालयाचा खेळाडू आली रियाज सय्यद (१२ वी विज्ञान,१९वर्ष वयोगट, १२०किलो वजनगट) याने दमदार कामगिरी करत महाराष्ट्रातून ओपन गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला.त्याची १२ एप्रिल रोजी छत्तीसगड येथे होणाऱ्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली. अलीने स्पर्धे दरम्यान उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य, चपळता आणि जिद्दीच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांवर (१०.००)मात करत विजेतेपद मिळवले. पुढील राष्ट्रीय स्पर्धेसाठी संस्थेचे अध्यक्ष सतीश काकडे देशमुख व संस्थेचे विकास समितीचे अध्यक्ष तथा सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे विद्यमान संचालक अभिजीत काकडे देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे, संस्थेचे सचिव सतीश लकडे यांनी अलीचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या. तो राष्ट्रीय स्तरावरही महाराष्ट्राचे नाव उज्वल करेल, असा विश्वास व्यक्त केला. पैलवान अलीला महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा.डॉ. बाळासाहेब मरगजे,प्रा. दत्तराज जगताप यांनी मार्गदर्शन केले.

### भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी

**दिवे** : दिवे (ता. पुरंधर) परिसरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढला असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः पुणे-पंढरपूर पालखी महामार्गावर भटक्या कुत्र्यांचे कळप फिरताना दिसत आहेत. या कुत्र्यांमुळे आतापर्यंत अनेक दुचाकी वाहनांचे लहान-मोठे अपघात घडल्याची माहिती स्थानिकांनी दिली.



दिवे (ता. पुरंधर) येथील खंबाईमाता मंदिर परिसरात फिरताना दिसणारी भटकी कुत्री

डोंगरालगतच्या भागात मृत कोंबड्या टाकल्या जात असल्याने त्या ठिकाणी भटक्या कुत्र्यांची संख्या वाढत आहे. तसेच महामार्गालगत असलेल्या हॉटेल परिसरातही या कुत्र्यांची मोठ्या प्रमाणात वर्दळ पाहायला मिळते. साधारणपणे १५ ते २० कुत्र्यांचे कळप एकत्र फिरत असल्याने नागरिकांना तसेच शालेय विद्यार्थ्यांना धोका निर्माण झाला आहे.दिवे परिसरात पुणे पंढरपूर पालखी महामार्गा लगत प्रार्थमिक शाळा, श्री कातोबा हायस्कूल दिवे, जीवन वर्धिनी दिव्यांग विद्यालय, शासकीय तंत्रनिकेतन अशी विद्यालय आहेत अशा परिस्थितीत नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष घालून भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी गणेश झेंडे, संदीप झेंडे व स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

### नाझरे सुपे परिसरात वादळी वाऱ्यासह पावसाची जोरदार हजेरी

**नाझरे सुपे** : पुरंदर तालुक्यातील नाझरे सुपे गाव व परिसरात आज सायंकाळी सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास वादळी वाऱ्यासह पूर्वमोसमी पावसाने जोरदार हजेरी लावली. अचानक सुरू झालेल्या या पावसामुळे काही काळ गावातील जनजीवन विस्कळीत झाले. पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून उष्णतेने त्रस्त झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. पावसाची सुरुवात जोरदार वाऱ्याने झाली. त्यानंतर काही वेळ मुसळधार पाऊस पडला. या पावसामुळे गावातील मुख्य रस्ते तसेच सखल भागात ठिकठिकाणी पाणी साचल्याचे दिसून आले. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची एकच धावपळ उडाली. अनेक नागरिकांनी दुकाने, घरांच्या ओट्यांवर तसेच सुरक्षित ठिकाणी आसरा घेतला. वादळी वाऱ्यामुळे काही ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटल्या असून काही ठिकाणी झाडे पडण्याची शक्यता देखील व्यक्त होत आहे. सुदैवाने कोणतीही मोठी दुर्घटना घडली नसल्याची माहिती स्थानिकांनी दिली. दरम्यान, या अवकाळी पावसाचा शेती पिकांना फारसा फायदा होणार नसल्याची प्रतिक्रिया शेतकऱ्यांकडून व्यक्त करण्यात आली. काही ठिकाणी उभ्या पिकांना वाऱ्यामुळे नुकसान होण्याची भीती देखील शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. तसेच हवामानातील अचानक झालेल्या बदलामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज असल्याचेही सांगितले जात आहे. मात्र वाढत्या तापमानामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना या पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला असून वातावरणात सुखद गारवा निर्माण झाला आहे.

# सासवड नगरपरिषदेकडून ५.७० कोटींची विक्रमी कर वसुली

## अभय योजनेचा फायदा; थकीत कर भरण्यास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सासवड** : सासवड नगरपरिषदेमार्फत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात राबविण्यात आलेल्या विशेष कर वसुली मोहिमेत तब्बल ५ कोटी ७० लाख रुपयांची विक्रमी वसुली करण्यात आली आहे. थकीत मालमत्ता करावरील शास्ती माफीच्या अभय योजनेमुळे करदात्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिल्याने नगरपरिषदेला ही उल्लेखनीय कामगिरी करता आली.

थकीत कर वसुलीसाठी नगरपरिषद प्रशासनाने महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ अंतर्गत मालमत्ता सील करणे, नळ कनेक्शन बंद करणे आदी कारवाया केल्या.

नगराध्यक्षा आनंदी चंद्रकांत जगताप म्हणाल्या, ''अल्प कालावधीत झालेली कर वसुली समाधानकारक आहे. कर भरण्यास अडचण असलेल्या थकबाकीदारांसाठी अभय योजना दिलासादायक ठरली आहे. उर्वरित थकीत मिळकतधारकांनी अधिक माहितीसाठी सासवड नगरपरिषद कार्यालयाशी संपर्क साधावा.''

त्यामुळे अनेक थकबाकीदारांनी आपला थकीत कर भरला. राज्य शासनाने जाहीर केलेल्या १०० टक्के शास्ती माफी अभय योजनेअंतर्गत ३१ मार्च २०२५ पर्यंत कर भरणाऱ्या मिळकतधारकांना दंड माफी देण्यात आली. या योजनेत सुमारे ४६५ मिळकतधारकांनी सहभाग घेतला असून त्यांना सुमारे ६५ लाख रुपयांच्या शास्ती माफीचा लाभ मिळाला.

नागरिकांच्या सोयीसाठी नगरपरिषदेकडून सुट्टीच्या दिवशीही कर भरणा केंद्र सुरू ठेवण्यात आले होते. ३१ मार्च रोजी मध्यरात्रीपर्यंत कर स्वीकारण्यात आले. या योजनेमुळे नगरपरिषदेच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झाली असल्याची माहिती मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांनी दिली.

**ठळक बाबी :** ५.७० कोटी रुपयांची विक्रमी कर वसुली ४६५ मिळकतधारकांचा अभय योजनेत सहभाग ६५ लाख रुपयांची शास्ती माफी कर वसुलीसाठी विशेष मोहिमेचा सकारात्मक परिणाम



सासवड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा आनंदी चंद्रकांत जगताप.

# दस्तनोंदणीत वाढ

## नोंदणी विभागाकडे ६१ हजार कोटींचा महसूल जमा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : राज्याच्या नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडे २०२५-२६ या आर्थिक वर्षात ४५ लाख ७८ हजार दस्तनोंदणीमधून सुमारे ६१ हजार कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे. मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत यंदा दस्तनोंदणीमध्ये सुमारे अडीच लाखांची वाढ झाली आहे. मात्र, महसुलात केवळ ३ हजार कोटी रुपयांचीच वाढ नोंदविण्यात आली आहे. भाडेकरारांचे दस्त वगळता मालमत्ता खरेदी-विक्रीशी संबंधित दस्तांमध्ये सुमारे एक लाखाने वाढ झाल्याची माहिती सहनोंदणी महानिरीक्षक राजेंद्र मुठे यांनी दिली. यावरून मालमत्ता व्यवहारांमध्ये वाढ झाल्याचे स्पष्ट होत आहे. गेल्या आर्थिक वर्षात नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून रेडीरेकनर अर्थात जमीन, सदनिका, दुकाने आदींच्या वार्षिक बाजारमूल्य दरांत सरासरी ३.८९ टक्क्यांची वाढ करण्यात आली होती. या दरवाढीच्या पार्श्वभूमीवर महसुलात वाढ होईल, या अपेक्षेने सरकारने २०२५-२६ या वर्षासाठी ६३ हजार ५०० कोटी रुपयांचे उद्दिष्ट निश्चित केले होते. मात्र, प्रत्यक्षात विभागाने या उद्दिष्टाच्या ९६.५८ टक्के इतका म्हणजेच ६१ हजार २८२ कोटी रुपयांचा महसूल गोळा केला आहे. उद्दिष्ट पूर्णतः साध्य झाले नसले तरी त्याच्या जवळपास महसूल गोळा करण्यात विभागाला यश मिळाले आहे.

# ऊसतोड महिला कामगारांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती करण्याचे निर्देश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : राज्यशासनाने गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियासंदर्भात राज्यस्तरीय समिती पुर्नगठीत करण्यात आली आहे, या समितीचे कामकाज अधिक गतीने तसेच प्रभावीपणे होण्यासाठी लवकरात लवकर जिल्हास्तरीय समित्यांच्या कामाचे स्वरूप लवकरच ठरवण्याचा निर्णय विधान परिषदेच्या उप सभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी घेतला..

ऊसतोड महिला कामगारांमध्ये आरोग्य विषयी व्यापक स्वरूपात जनजागृती करावी तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात यावे, असेही निर्देश डॉ. गोऱ्हे यांनी दिले.

पुणे विधान भवन येथील झुंबर सभागृह येथे गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियासंदर्भात स्थापित राज्य समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी आमदार डॉ. मनीषा कायंदे (दूरदृष्यप्रणालीद्वरे) तर आमदार नमिता मुंदडा, आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कंदेवाड, आरोग्य सेवा अतिरिक्त संचालक डॉ. संदीप सांगळे, सहसंचालक डॉ. सुनिता गोल्हाईत, छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड जिल्ह्यातील शासकीय आरोग्य संस्थांचे प्रमुख, समिती सदस्या डॉ. संगीता चव्हाण, युनिसेफचे आरोग्य तज्ज्ञ डॉ. मंगेश गढरी यांच्यासह तसेच समितीचे सदस्य उपस्थित होते.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, जिल्हस्तरीय समितीमार्फत मागील ३ वर्षातील राज्यातील ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्य विषयक समस्यांबाबत तपासणी करावी. खाजगी रुग्णालयात गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियांबाबत तपासणी करावी. रुग्णालयामार्फत अनावश्यक शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत किंवा कसे या बाबतीत तपास करणे. अनावश्यक शस्त्रक्रियांवर प्रतिबंध घालण्यासाठी उपाययोजना सुचविणे आणि या समितीच्या वर्षातून कार्यक्रमाचे वेळापत्रक तयार करावे .

शासन ऊसतोड महिला कामगाराचे जीवनमान अधिक सुखकर करण्याकरिता प्रयत्नशील आहे. आरोग्य विभागाच्यावतीने सुमारे एक लाख ऊसतोड महिला कामगारांना आरोग्य सेवा पोहचविण्याचे काम केले आहे. या कामगारासोबत राज्यातील १७ जिल्ह्यातून ऊसतोडीकरिता स्थालांरित होणाऱ्या कामगारासोबत सुमारे ५ हजार मुले सोबत असतात, या मुलांच्या आरोग्य, शिक्षणाकरिता करावयाच्या उपाययोजना, मासिक पाळीच्यावेळी वापरण्यात येणारी आयुधे, सॅनिटरी नॅपकिन मोफत पुरवठा, अधिकच्या आरोग्य पुरविण्यासोबत आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. येत्या काळात सहकार विभाग, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, ग्रामविकास विभाग, विधी व न्याय विभाग आणि यासंबंधित काम करणारे घटकांसोबत घेवून बैठक आयोजित करण्यात येईल. त्यापूर्वी समाजातील आरोग्य व महिला क्षेत्रात काम करणारे घटक, सामाजिक संघटनांनी पुढे येवून आपल्या सूचना मांडाव्यात, असेही आवाहन डॉ.गोऱ्हे यांनी केले.

# कोण आहे रामलिंगचा प्रज्ञावंत?

## स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद; विद्यार्थ्यांचा गौरव

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई** : -शिरूर तालुक्यातील रामलिंग येथे स्व.गणेश गौतम घावटे पाटील यांच्या ३७ व्या जयंतीनिमित्त कोण आहे रामलिंगचा प्रज्ञावंत? ही २०२६ सालातील सामान्य ज्ञानावर आधारित परीक्षा उत्साहात पार पडली. रामलिंग महिला उन्नती बहुउद्देशीय सामाजिक संस्था व स्व. गणेश गौतम घावटे पाटील युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रामलिंग येथे स्व. घावटे पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून परीक्षेला सुरुवात करण्यात आली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमधील बुद्धिमत्ता, आत्मविश्वास आणि स्पर्धा परीक्षांची तयारी वाढावी, तसेच त्यांच्या सामान्य ज्ञानात भर पडावी या उद्देशाने ही स्पर्धा दरवर्षी आयोजित केली जाते.




या परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये प्रथम क्रमांक प्रणिता कापरे, द्वितीय क्रमांक रुद्र माने आणि तृतीय क्रमांक दीक्षा कांबळे यांनी पटकावला.

कार्यक्रमादरम्यान अनेक मान्यवरांनी मनोगते व्यक्त करत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता जगताप तसेच शिक्षक दादाभाऊ वाघमारे, अनिल जगदाळे, जयश्री मांजरे, नीता वाबळे, इतर शिक्षकवृंद यांनी मोलाचे सहकार्य केले.यावेळी शाळेला महापुरुषांच्या फोटो फ्रेम्स भेट देण्यात आल्या. कार्यक्रमास उपसरपंच यशवंत कर्डीले, सामाजिक कार्यकर्ते गौतम घावटे, विठ्ठल जगदाळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष विजू दौंडकर, सदस्य निलेश लोंढे, रमेश कर्डीले, पुनम औटी यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रामलिंग महिला उन्नती बहुउद्देशीय सामाजिक संस्था अध्यक्ष राणी कर्डीले यांनी केले.

# बारामतीत राष्ट्रवादी काँग्रेसची आढावा बैठक

## कार्यकर्त्यांचा एकजूट निर्धार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बारामती** : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या बारामती तालुका व शहरातील पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध सेल प्रतिनिधी, बूथ कमिटी सदस्य व समन्वयक यांची आढावा बैठक कसबा, बारामती येथील पक्ष भवनात उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडली.

बैठकीस जय पवार प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी कार्यकर्त्यांशी मुक्त संवाद साधत त्यांच्या प्रश्नांना थेट उत्तरे दिली. बैठकीदरम्यान अजित पवार यांच्या जीवनकार्यावर आधारित प्रेझेंटेशन सादर करण्यात आले. त्यांच्या लोकहिताच्या निर्णयांमुळे जनतेच्या जीवनात झालेला सकारात्मक बदल आणि त्यांच्या कार्यशैलीचे विविध पैलू यावेळी उलगडण्यात आले.

कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, विकासकामांमध्ये कोणताही भेदभाव न करता सर्वांना न्याय देण्यात आला, त्यामुळे प्रत्येक कुटुंबाशी भावनिक नाते निर्माण झाले आहे.

जय पवार यांनी आपल्या मनोगतात कार्यकर्त्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करत शेवटपर्यंत साथ देण्याचा शब्द दिला. अपघातासंदर्भात अधिकृत अहवाल आल्यानंतरच सविस्तर




भूमिका मांडणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

येत्या ६ एप्रिल रोजी सुनेत्रा पवार यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला जाणार असल्याची माहिती देण्यात आली. सर्व कार्यकर्त्यांनी त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

या प्रसंगी सुनील बनसोडे, उमेश पाटील, राजेंद्र कोरेकर, संभाजी होळकर, संदीप बांदल, सचिन सातव, किरण इंगळे, किरण गुजर यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे प्रलंबित कामांबाबत चर्चा

## माजी आमदार संजय जगताप यांची अधिकाऱ्यांसोबत महत्त्वाची बैठक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे** : पुरंदर आणि हवेली तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गाची प्रलंबित कामे, उड्डाणपूल आणि शहरांतर्गत रस्ते रुंदीकरण या विषयांवर माजी आमदार संजय जगताप यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसोबत पुण्यात सकारात्मक चर्चा केली. सासवड, जेजुरी, नीरा आणि फुरसुंगी या भागातील रखडलेली कामे, वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी विविध उपाययोजना करण्याच्या मागण्या यावेळी करण्यात आल्या. पुणे येथील महामार्ग प्राधिकरणाच्या कार्यालयात झालेल्या या बैठकीस प्राधिकरणाचे प्रबंधक एस. एस. कदम आणि अभियंता अभिजीत औटी व इतर अधिकारी उपस्थित होते. यावेळी संजय जगताप यांनी पुरंदर - हवेलीतील महत्त्वाच्या शहरांतील वाहतूकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या मागण्या मांडल्या., यामध्ये सासवड बाह्यवळणाच्या चंदनटेकडी आणि बोरावके मळा या दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल उभारणे. सासवड हद्दीतील चंदन टेकडी ते बोरावके मळा या शहरातून जाणाऱ्या रुक्मिणी मंदिराचे नवीन बांधकाम करणे, फुरसुंगी - भेकराईनगर येथे उड्डाणपुलाची निर्मिती करणे, तसेच, फुरसुंगी - भेकराईनगर येथील राष्ट्रीय महामार्गांवर असलेल्या



**पुणे** : राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या कार्यालयात अधिका-यांशी चर्चा करताना माजी आमदार संजय जगताप व इतर मान्यवर.

रस्त्याचा पालखी महामार्गात समावेश करून भूसंपादनासह चौपदरीकरण करणे. याबरोबरच पिसुर्टी फाटा ते लोणंद बाह्यवळण या दरम्यानच्या पिसुर्टी फाटा ते नीरा शहर आणि नीरा शहर ते लोणंद या रस्त्याचे भूसंपादन करून चौपदरीकरण करणे.जेजुरी शहरात वाहतूक सुलभतेसाठी उड्डाणपूल उभारणे.दिवे घाटातील श्री विठ्ठल मुख्य ड्रेनेज लाईन संदर्भात महामार्ग प्राधिकरणाचे अभियंता व फुरसुंगी नगरपालिकेचे मुख्याधिकारी व अभियंता यांनी एकत्रित कामाची पाहणी करून येणाऱ्या अडिअडचणी सोडवण्याबाबत चर्चा झाली.

**अधिकाऱ्यांचे सकारात्मक आश्वासन :**

या मागण्यांवर बोलताना प्रबंधक एस. एस. कदम आणि अभियंता अभिजीत औटी यांनी सांगितले की, सासवड आणि नीरा शहरातील रस्ते भूसंपादनाबाबतचा प्रस्ताव वरिष्ठांकडे तात्काळ सादर केला जाईल. सासवड येथील चंदन टेकडी आणि बोरावके मळा येथील उड्डाणपुलांचे काम लवकरच सुरू करण्यात येणार आहे. जेजुरीतील उड्डाणपुलाचा नकाशा तयार असून, फुरसुंगी-भेकराईनगर येथील उड्डाणपूल भविष्यातील मेट्रोच्या मार्गीकेला अनूसरून, मेट्रो मार्गीकेचा विचार करून तयार करण्यात येणार आहे., असे त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीस सासवडचे उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, जिल्हा परिषद सदस्य अजय इंगळे, वडकीतील सचिन गायकवाड, फुरसुंगीतील रणजित रासकर यांच्यासह सर्व नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

# लाखणगावात तीन एकर कलिंगड बाग उध्वस्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी** : लाखणगाव (ता. आंबेगाव) येथील शेतकरी विश्वनाथ रोडे यांची तीन एकरांवरील कलिंगडाची बाग अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे पूर्णपणे उध्वस्त झाली आहे. काढणीला आलेली फळे सडल्याने तसेच वेली जमीनदोस्त झाल्याने शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

ही बाग नुकतीच तोडणीसाठी तयार झाली होती; मात्र अवकाळी पाऊस आणि गारपिटीच्या तडाख्यामुळे संपूर्ण बाग उद्ध्वस्त झाली. या घटनेत विश्वनाथ रोडे यांचे अंदाजे सहा लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

आधीच युद्धजन्य परिस्थितीमुळे बाजारभाव घसरले होते. त्यातच अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेतकरी अधिकच आर्थिक संकटात सापडला असून हतबल झाला आहे.

या नैसर्गिक आपत्तीमुळे परिसरातील अनेक शेतकरी अडचणीत आले आहेत. डोळ्यादेखत तयार झालेला शेतीमाल अस्मानी संकटामुळे नष्ट झाला असून कष्टाने फुलवलेल्या पिकांची नासधूस झाल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू आहेत.

दरम्यान, लाखणगाव येथीलच शेतकरी शिवाजी रोडे यांनी एक एकर क्षेत्रात पपईची लागवड केली होती. पपई तोडणीला आली होती त्यांच्या पिकालाही अवकाळी पाऊस व गारपिटीचा मोठा फटका बसून पपईची बाग उद्ध्वस्त झाली आहे.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने पंचनामे करून अधिकाधिक आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी करत आहे.



लाखणगाव ( ता. आंबेगाव ) येथील शेतकरी विश्वनाथ रोडे यांची अवकाळी पाऊस व गारपिटीने तीन एकर कलिंगडाचा बाग उध्वस्त झालेला

# कुकडी डावा कालवा नूतनीकरणासाठी ४७ कोटी मंजूर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : अहिल्यानगर, पुणे व सोलापूर जिल्ह्यांतील शेतीसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या कुकडी डावा कालव्याच्या १६५ ते २४९ किलोमीटरमधील वितरण व्यवस्थेच्या नूतनीकरणासाठी राज्य शासनाने मोठा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने या कामासाठी ४७ कोटी ३ लाख ५२ हजार ४०० रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिली असून, २७ मार्च २०२६ रोजी यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री न देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा निर्णय झाला असून, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता. कुकडी प्रकल्पांतर्गत असलेल्या या मुख्य कालव्याचे बांधकाम सुमारे तीस वर्षांपूर्वी झाले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने सिंचनासाठी पाणी सोडले जात असल्यामुळे आणि अस्तरीकरण सलग नसल्यामुळे कालव्याची मोठी झीज झाली आहे. कालव्यात वाढलेली झाडेझुडुपे, साचलेला राडारोडा आणि नादुरुस्त झालेली जुनी बांधकामे यामुळे पाणी वहनात मोठे अडथळे येत होते. यामुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याची गळती होऊन शेवटच्या घटकापर्यंत पाणी पोहोचण्यास विलंब होत होता. ही दुरवस्था दूर करण्यासाठी शासनाच्या विशेष दुरुस्ती अंतर्गत हे काम हाती घेण्यात आले आहे.

# लांब पल्ल्याच्या कावडींचे परतीच्या प्रवासात जेजुरी येथे स्वागत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस** : नगर जिल्ह्यातील कळस, परखतपूर व कुंभेफळ या श्री क्षेत्र शिखर शिंगणापूर येथे धार घालण्यासाठी जाणाऱ्या तीन कावडींचे आज (गुरुवार) श्री क्षेत्र जेजुरी येथे परतीच्या प्रवासात स्वागत करण्यात आले. चैत्र शुद्ध पंचमी म्हणजेच २३ मार्च ते चैत्र वद्य तृतीया म्हणजेच ६ एप्रिल असा पंधरा दिवस पायी प्रवास करत तब्बल सातशे किलोमीटरचा लांबचा पल्ला पार करत गेली साडेतीनशे वर्षांहून अधिक काळ हा सोहळा कै. प .पू. सुभाषपुरी महाराज यांच्या आशीर्वादाने सुरू आहे.कळस गावचे रहिवाशी डॉ शिवाजीराय ढगे व डॉ शीतल ढगे यांच्या वतीने गेली चाळीस वर्षे जेजुरी येथे हा स्वागताचा कार्यक्रम होत आहे. महाआरती आणि कावड भक्तांसाठी महाप्रसाद वाटप करून ढगे दांपत्याने ही परंपरा अखंड सुरू ठेवली आहे.

जेजुरी येथील शिवभक्त राजू चव्हाण यांच्या निवासस्थानी अनेक भाविकांच्या उपस्थितीत कावडींचा स्वागत कार्यक्रम पार पडला.महिला बालकल्याण उपायुक्त सुधीर साळवी, सासवड पालिका सेवानिवृत आरोग्य अधिकारी मोहन चव्हाण, डॉ रमेश देसाई, निवृत्ती आबा बागडे, अरविंद भोसले, रत्नमाला शिंदे, शारदा सावंत, विलास पवार, शाम कांबळे, मंगेश पावडे, सरस्वती गद्रे सुरेश कुंभारकर अरविंद भोसले यांसह अनेक शिवभक्त या



वेळी उपस्थित होते. पायी वारीत सुमारे शंभरहून अधिक भक्त सहभागी झाले असून वयोवृद्ध देवासर वाकचौरे, चंद्रकांत वाकचौरे, पोपट वाकचौरे त्याचप्रमाणे १५ वर्षीय वेदांत ढगे, प्रथमेश गोसावी यांचा सहभाग आहे. पुष्पा वाक्चौरे यांसह काही महिलाही या पायी सोहळ्यात सामील झाल्या आहेत

# बार कौन्सिलचा 'काउंटडाउन' सुरू

## मतमोजणीवर राज्यातील वकिलांची नजर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : महाराष्ट्राच्या वकिली क्षेत्रासाठी अत्यंत निर्णायक ठरणाऱ्या बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँन्ड गोवा निवडणुकीच्या मतमोजणीला सोमवार, दिनांक ६ एप्रिलपासून अधिकृतपणे सुरुवात होत असून संपूर्ण राज्यातील वकिलांचे लक्ष आता या प्रक्रियेवर खिळले आहे. कडक सुरक्षा, स्पष्ट नियम आणि पारदर्शक पद्धतीत होणारी ही मतमोजणी आगामी नेतृत्वाचे चित्र ठरवणार असल्याने उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. मतमोजणी प्रक्रिया ही पूर्णपणे कायदेशीर चौकटीत आणि ठरवून दिलेल्या नियमांनुसार पार पडणार आहे. अर्वोंलरींशी अलीं, १९६१ तसेच बार कौन्सिलच्या नियमांचे काटेकोर पालन करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. मतपेट्या सुरक्षित कक्षात ठेवण्यात आल्या असून त्या पोलिस बंदोबस्त आणि सीसीटीव्ही देखरेखी खाली आहेत.

मतमोजणी केंद्रात प्रवेश अत्यंत मर्यादित ठेवण्यात आला असून मोबाईल व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांना सक्त मनाई करण्यात आली आहे. प्रत्येक मतपत्रिकेची त्रेॲा ए शी पडताळणी करून त्याची नोंद आणि डिजिटल एंट्री केली जाणार आहे. अवैध मतांबाबत अंतिम निर्णय रिटर्निंग ऑफिसर घेणार असून त्यांचा निर्णय अंतिम मानला जाणार आहे. संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता आणि विश्वासार्हता राखण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर अस्मि विचारमंचा सोबत झालेल्या चर्चेत ॲड. रवींद्र शिंदे, ॲड. रोहित देशपांडे, ॲड. सोमनाथ हरपुडे, ॲड. अक्षय हेंद्रे आणि ॲड. जगदीश अगरवाल यांनी सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, ही निवडणूक केवळ प्रतिनिधी निवडण्यापुरती मर्यादित नसून वकिली व्यवसायाच्या भविष्यास दिशा देणारी आहे. तसेच प्रत्येक मतामागे वकिलांचा विश्वास आणि अपेक्षा दडलेल्या आहेत आणि त्या पूर्णपणे जपल्या जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पुण्यातून जास्तीत जास्त सदस्य निवडून येतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. मतमोजणी प्रक्रिया टप्प्याटप्प्याने पार पडणार असून दररोज मतमोजणीची प्रगती, वैध-अवैध मतांची संख्या तसेच पहिल्या पसंती च्या मतांची माहिती अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. अंतिम निकाल जाहीर झाल्यानंतर बार कौन्सिल च्या नव्या नेतृत्वाचे स्पष्ट चित्र समोर येणार आहे. हा केवळ निकाल नाही हा वकिली क्षेत्राच्या भविष्यासाठीचा निर्णायक निर्णय आहे, अशी भावना वकिली क्षेत्रातून व्यक्त होत असून संपूर्ण राज्याचे लक्ष आता या ऐतिहासिक मतमोजणीकडे लागले आहे.

द·ख·ल

## बौद्ध संस्कार संघाच्या वतीने १४ एप्रिलला ‘भीमपहाट’चे आयोजन

**अहिल्यानगर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बौद्ध संस्कार संघाच्या वतीने मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६ रोजी पहाटे ५ वाजता ‘भीमपहाट’ कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. चेतना लॉन्स, छ. संभाजीनगर रोड, अहिल्यानगर येथे होणाऱ्या या कार्यक्रमात भीमगीतांच्या सुरांनी परिसर भारावून जाणार असून, सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या व्यक्तींना ‘भीमपहाट सन्मान पुरस्कार’ देऊन गौरविण्यात येणार आहे. या उपक्रमाबाबत माहिती देताना आयोजक भाऊसाहेब देठे यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर घडविणे, तसेच समाजातील प्रेरणादायी कार्य करणाऱ्या व्यक्तींना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा ‘भीमपहाट’ कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे. यावर्षी सामाजिक कार्यकर्ता जालिंदर बोरुडे, आनंद ऋषी हॉस्पिटलमध्ये कार्यरत असणाऱ्या मुख्य परिचारिका स्मिता मनोरंजन रुपवते, तसेच गुणे शास्त्री आयुर्वेदिक महाविद्यालयाचे सहाय्यक प्रा., कान ,नाक ,घसातज्ञ डॉ. तारकेश्वर सुखदेव वानखडे यांना ‘भीमपहाट सन्मान पुरस्कार’ प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती देठे यांनी दिली. त्यांच्या कार्याचा गौरव करून समाजात सकारात्मक संदेश देण्याचा प्रयत्न या निमित्ताने करण्यात येणार आहे.

## राम शिंदे घेणार सोमवारी कर्जतच्या भाजपा कार्यकर्त्यांची कार्यशाळा

**कर्जत :** महाराष्ट्र भाजपा प्रदेशाच्या आदेशाने कर्जत मंडळाची कार्यशाळा येत्या सोमवार, दि ६ एप्रिल रोजी शिवकमल मंगल कार्यालय चिंचोळी काळदात येथे आयोजित करण्यात आली असून या कार्यशाळेस विधान परिषदेचे सभापती प्रा राम शिंदे मार्गदर्शन करणार आहे. सदर कार्यशाळेत सक्रिय कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार असून यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भाजपाचे कर्जत मंडळ अध्यक्ष अनिल गदादे यांनी केले आहे. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या कर्जत संपर्क कार्यालयात शुक्रवारी नियोजन बैठक संपन्न झाली. यात जेष्ठनेते ड.कैलास शेवाळे, अंबादास पिसाळ, बाजार समितीचे उपसभापती अभय पाटील, अशोक खेडकर,नितीन खेतमाळीस, बापुराव शेळके, काकासाहेब धांडे, लहू वतारे, दादा सोनमाळी, विनोद दळवी, प्रसाद ढोकरीकर, गणेश क्षीरसागर, नीलकंठ शेळके, नंदलाल काळदाते, शरद म्हेत्रे, काका ढेरे, पांडुरंग क्षीरसागर आदी उपस्थित होते. ६ एप्रिल भाजपाचा स्थापना दिवस असून त्या निमित्त कार्यालयावर झेंडावंदन, सजावट, मिठाई वाटप, जेष्ठ कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात येणार असून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. सदर निवासी कार्यशाळेत सभापती प्रा राम शिंदे यांचे सह प्रदेश स्तरावरील नेते मार्गदर्शन करणार आहे यासाठी तालुक्यातील सर्वच कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मंडळ अध्यक्ष अनिल गदादे यांनी केले आहे.

## शिस्तप्रिय, दूरदृष्टी असलेले प्राचार्य अजयकुमार बारगळ सेवानिवृत्त

**अहिल्यानगर :** अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अ. ए. सो. चे रूपीबाई मोतीलालजी बोरा विद्यालयाचे प्राचार्य श्री अजयकुमार जगन्नाथ बारगळ यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित निरोप समारंभ वातावरणात संपन्न झाला. विद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमाला शिक्षक, विद्यार्थी, पालक व मान्यवरांची मोठी उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या प्रमुख कार्यवाह सौ. छायाताई फिरोदिया होत्या. आपल्या अध्यक्षीय मनोगतात त्यांनी प्राचार्य बारगळ यांच्या शिस्तप्रिय, नियोजनबद्ध व विद्यार्थीकेंद्री कार्यशैलीचे विशेष कौतुक केले. संस्थेने दिलेली कोणतीही जबाबदारी बारगळ सरांनी अत्यंत यशस्वीरीत्या पूर्ण केली. विद्यार्थ्यांच्या हिताच्या योजना राबवून त्या पूर्णत्वास नेण्याची त्यांची जिद्द अनुकरणीय आहे, असे त्या म्हणाल्या. शाळा समितीचे चेअरमन व संस्थेचे सल्लागार श्री भूषणजी भंडारी यांनीही बारगळ सरांच्या कार्यपद्धतीचा गौरव करताना त्यांच्या नेतृत्वगुणांचा विशेष उल्लेख केला. त्यांच्या कार्यकाळात सुरू करण्यात आलेल्या ई-रिझल्टशीट, ई-कॅटलॉग व ऑनलाईन कोचिंग क्लासेस या उपक्रमांचे संस्थेकडून विशेष कौतुक करण्यात आले.

## कायद्याचा अभ्यास करणाऱ्यांसाठी मार्केट यार्ड येथे नवीन बॅच

**अहिल्यानगर :** कायदा (लॉ) परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी येथील मार्केट यार्ड परिसरात रास्त दरात क्लासेस सुरू करण्यात आले आहेत. अल्पावधीत प्रशिक्षणार्थ्यांकडून मिळालेल्या प्रतिसादामुळे आता येथेच नवी बॅच सुरू करण्यात येत आहे. अशा प्रकारचे प्रशिक्षण देणारा नगरमधील हा एकमेव क्लास असल्याचे संचालक गजानन फुंदे यांनी सांगितले.

लॉ-सीईटी अॅण्ड क्लॅट या क्लासमध्ये लॉच्या विद्यार्थ्यांना आवश्यक असलेले लॉजिकल रिझनिंग, जनरल नॉलेज, मुख्य कायद्याचे विषय तज्ज्ञ वकिलांकडून शिकवले जातात. याची अत्यंत उत्कृष्ट तयारी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांकडून करून घेतली जाते. त्यांना हा क्लास उज्ज्वल यशाची हमी देतो, अशी माहिती संचालक श्री. फुंदे यांनी दिली.

लॉ करताना नोकरीत असलेल्या विद्यार्थ्यांसाठीही या क्लासने ‘संडे बॅच’ सुरू केलेली असून, असे विद्यार्थी रविवारी क्लास करून आपल्या परीक्षेची योग्य तयारी करू शकतात, असे सांगण्यात आले. विद्यार्थ्यांना वकिली पद्धतीने पॉईंट मांडणे, विषयाची खोली समजावून सांगणे तसेच वकिलीसाठी आवश्यक असलेले गुण शिकविण्यासाठी प्रयत्न केले जातात, असेही संचालक श्री. फुंदे यांनी सांगितले.

### ढवळपुरीतील रोजगार सेवकावर निधी अपहाराचा गंभीर आरोप

# रोहयो कामांमध्ये कुटुंबातील सदस्यांसह बोगस नावे टाकून लाखो रुपयांचा गैरव्यवहार?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** पारनेर तालुक्यातील मौजे ढवळपुरी येथे रोजगार हमी योजनेच्या (रोहयो) कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असून, ग्रामपंचायत अंतर्गत कार्यरत असलेल्या रोजगार सेवकाने बोगस मजुरांची नावे टाकून तसेच स्वतःच्या नावावरही रक्कम काढून शासकीय निधीचा अपहार केल्याचा आरोप अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आला आहे.

समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी याबाबत प्रशासनाकडे तक्रार करत संबंधित रोजगार सेवकावर तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच, येत्या १५ दिवसांत कारवाई न झाल्यास नाशिक येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

ढवळपुरी हे मोठ्या लोकसंख्येचे गाव असून येथे रोहयो अंतर्गत विविध कामे सुरू आहेत. या कामांसाठी नियुक्त करण्यात आलेल्या रोजगार सेवक घुमटकर यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. ऑनलाईन हजेरी पत्रकांची तपासणी केल्यानंतर अनेक व्यक्ती प्रत्यक्ष कामावर नसतानाही त्यांच्या नावावर हजेरी दाखवून एटीएम द्वारे रक्कम काढण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. यामध्ये स्वतःचे नाव, कुटुंबातील सदस्यांची नावे तसेच इतर बोगस मजुरांची नावे टाकून निधी काढल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, त्यांच्या आईचे नावही हजेरीत टाकण्यात आले असून त्या प्रत्यक्षात बाजारात भाजी विक्रीचे काम करत असल्याचे सांगण्यात आले आहे.

तक्रारीनुसार, काही वयोवृद्ध व्यक्ती काम करण्याच्या स्थितीत नसतानाही त्यांच्या नावावर हजेरी दाखवण्यात आली आहे. तसेच, काही व्यक्ती रांजणगाव एमआयडीसी येथे नोकरी करत असतानाही त्यांची नावे रोहयोच्या कामांमध्ये दाखवून रक्कम काढण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

याशिवाय, विहिरींसारख्या विविध कामांवरही मोठ्या प्रमाणात बोगस मजुरांची नावे टाकून निधी उचलण्यात आल्याचे आरोप करण्यात आले आहेत. घुमटकर यांच्या ताब्यात असलेल्या एटीएम कार्डच्या व्यवहारांची सखोल चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. संपूर्ण मजुरांच्या नोंदींची तपासणी करून ज्या-ज्या ठिकाणी गैरव्यवहार झाला आहे, त्या सर्व रकमा संबंधितांकडून वसूल कराव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे.

प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन दोषींवर तातडीने गुन्हा दाखल करावा, अन्यथा १५ दिवसांत कोणतीही ठोस कारवाई न झाल्यास नाशिक येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा समितीच्या वतीने देण्यात आला आहे.

## ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रतिभा खैरनार यांची निवड



**अहिल्यानगर :** छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सहावे राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी महिला साहित्यिक प्रतिभा खैरनार यांची निवड करण्यात आली.

स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने निमगाव वाघा (ता. नगर) येथे रविवार, दि. १७ मे रोजी होणाऱ्या या साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर नुकतीच संयोजन समितीची बैठक पार पडली. या बैठकीत खैरनार यांची निवड करण्यात आली. या बैठकीसाठी ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, डोंगरे संस्थेचे अध्यक्ष व संमेलनाचे मुख्य संयोजक पै. नाना डोंगरे, गणराज प्रकाशनचे प्रा. गणेश भगत, कवयित्री सरोज आल्हाट, बाळासाहेब देशमुख, भाऊसाहेब कदम, कवी गीताराम नरवडे, विशेष सरकारी वकील ड. सुरेश लगड, निवृत्ती महाराज कानवडे, राजेंद्र घोडके, लावणी सम्राज्ञी रोहिणी थोरात, बाळासाहेब मुनतोडे आदी उपस्थित होते.

प्रतिभा खैरनार या ता. नांदगाव (जि. नाशिक) येथील साहित्यिका असून, त्यांचे विविध काव्यसंग्रह व कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. त्यांच्या काव्यसंग्रह व कथासंग्रहाला विविध पुरस्कार देखील मिळालेले आहेत. साहित्य क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांची या संमेलनाच्या अध्यक्षपदी संयोजन समितीच्या वतीने एकमताने निवड करण्यात आली.

## काला हे परिपूर्णतेच प्रतीक : म्हस्के महाराज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शहरटाकळी :** काला हे परिपूर्णतेच प्रतीक आहे,काल्या शिवाय सप्ताहाची सांगता होत नाही ,काल्याचे किर्तन होत नाही तोपर्यंत सप्ताह पूर्ण झाला असं मानण्यात येत नाही , मग तुम्ही सप्ताह तीन दिवसाचा करा, पाच दिवसाचा करा नेहमी प्रमाणे आठ दिवसाचा करा.

सगळ्या धार्मिक अनुष्ठानाची समाप्ती वारकरी संप्रदायांमध्ये काल्याच्या किर्तनांने होत असल्याचे प्रतिपादन श्रीक्षेत्र ज्ञानेश्वर महाराज पैसखांब संस्थानाचे महंत ह भ प वेदांतचार्य देविदासजी महाराज म्हस्के यांनी केले,

शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी येथे आयोजित श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी सप्त शातकोत्तर सुवर्ण महोत्सव तथा पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह च्या निमित्ताने काल्याच्या कीर्तन सोहळा प्रसंगी काल्याची महती सांगताना ह भ प वेदांतचार्य महाराज म्हस्के बोलत होते.

देवाला सोडून केल्या जाणाऱ्या बाकीच्या सगळ्या गोष्टी ह्या दुःखा ला कारणीभूत आहेत त्यातून फक्त दुःख दुःख आणि दुःख च जन्माला येईल म्हणून देव मिळवण्यातच जीवनाची खरी धन्यता आहे जीवनाची सार्थकता आहे.

जिव शिवाशी आपलं पूर्ण अस्तित्व त्या परमेश्वरामध्ये इतकं विलीन करून टाकावं की आता पुन्हा काही केल्या वेगळ होणं शक्य नाही,जीवनाच्या खऱ्या काल्याकडे जाण्याकरिता आपल्याला वारंवार प्रेरणा मिळावी आपल्या बुद्धीवर पुन्हा पुन्हा त्याचे संस्कार व्हावेत आणि आपले जीवन देवाशी एकरूप होऊन राहावं म्हणून प्रतिवर्षी आपल्याला असे काले करावे लागतात.

अशा प्रकारे काल्याचे महत्त्व सांगताना भाविक मंत्रमुग्ध झाले होते,

सप्ताह नंतर शहरटाकळी ग्रामस्थांच्या वतीने पुरणपोळी आमटी च्या महाप्रसादाने सप्ताहाची सांगता झाली.यावेळी शहरटाकळी व परिसरातील महिला वर्ग , भावी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सप्ताह ला मिळालेल्या उत्स्फुर्त प्रतिसादाबद्दल सप्ताह कमिटी च्या वतीने सर्वांना धन्यवाद देण्यात आले.

## प्रथमेश जाधव ठरला बहिरोबावाडी भैरवनाथ केसरीचा मानकरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



कर्जत : बहिरोबावाडी (ता. कर्जत) येथे पार पडलेल्या कुस्ती मैदानात भैरवनाथ केसरी किताबाचा मानकरी प्रथमेश जाधव ठरला. जाधव याने डंकी या डावावर नाथा पालवे यास अस्मान दाखवत मानाची चांदीची गदा आणि रोख ४१ हजार रुपयांचा मानकरी ठरला. या कुस्ती मैदानासाठी तालुक्यातील अनेक मान्यवरांनी हजेरी लावत मल्लांना प्रोत्साहन दिले.

शुक्रवार, दि ३ रोजी भैरवनाथ यात्रेनिमित्त बहिरोबावाडी येथे यात्रा कमिटीच्यावतीने भव्य कुस्ती मैदान पार पडले. या मैदानाचे उदघाटन रमेश आबा यादव यांनी नारळ वाढवत केले. मैदानासाठी मलठण, करमाळा, हळगाव यासह महाराष्ट्रातील नामांकित मल्लांनी हजेरी लावली. यात कै विष्णू दादा यादव, कै संदिपान तोरडमल, कै आनंद अण्णा तोरडमल, कै रणजीत शिंदे, कै तहसीलदार नितीन यादव, कै दाससाहेब लक्ष्मण लाळगे, कै दशरथ भाऊ यादव, कै अशोक निंबाळकर, कै रोहित लाळगे, कै नंदू लाळगे, कै दादासाहेब शिंदे, कै कुलदीप तोरडमल या दिवंगत लोकांच्या स्मरणार्थ कुस्त्या संपन्न झाल्या. यात हर्षवर्धन पठाडे, गणेश चव्हाण, सुयोग माने, शुभम शिंदे, आदित्य परदेशी या मल्लांनी प्रेक्षणीय कुस्त्या पार पाडत कुस्ती शौकिनांची वाहवा मिळवली. भैरवनाथ केसरी या मानाच्या किताबासाठी प्रथमेश जाधव आणि नाथा पालवे यांच्यात लढत झाली. यात जाधव याने पालवेवर डंकी या डावावर अस्मान दाखवत चितपट केले. आणि बहिरोबावाडी भैरवनाथ केसरीवर आपले नाव कोरले. या मैदानासाठी पंच म्हणून सुरेश तोरडमल, संदीप गुरुजी, प्रभाकर लाळगे, डॉ बिभीषन तोरडमल, बाप्पू तोरडमल, मदन तोरडमल यांनी काम पाहिले. कुस्ती मैदान यशस्वीतेसाठी वस्ताद ईश्वर तोरडमल बापूराव तोरडमल यांनी विशेष परिश्रम घेतले. युवराज सोलनकर यांनी कुस्तीचे थेट समालोचन केले तर विजयकुमार तोरडमल यांनी आभार मानले.

**मल्ल घडविणाऱ्या गुरुंचा शिष्याकडून सन्मान**

बहिरोबावाडीच्या युवकांना कुस्तीचे धडे देत मल्ल घडविणाऱ्या बोरकर वस्ताद यांचा ग्रामस्थांनी विशेष सत्कार करीत त्यांना फेटा बांधत ११ हजार रुपयांची बिदागी देण्यात आली. बोरकर वस्ताद यांनी बहिरोबावाडीच्या अनेक युवकांना कुस्ती क्षेत्रात उतरवत त्यांना मार्गदर्शन केले होते. आजमितीस याच मल्लांनी अनेक कुस्तीचे मैदान गाजवत कुस्ती क्षेत्रात आपला दबदबा निर्माण केला.

### महसूल मंत्र्यांच्या बळीराजा शासन निर्णयाची

## श्रीगोंदा तालुक्यात यशस्वी अंमलबजावणी : जंगले पाटील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतलेल्या मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी श्रीगोंदा तालुक्यात प्रत्यक्ष कृतीतून होत असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.



शुक्रवारी दिनांक ३ एप्रिल रोजी गुड फ्रायडे या शासकीय सुट्टीच्या दिवशीही चळवळीच्या पुढाकारातून शेतकरी व प्रशासन यांच्यात समन्वय साधत बन पिंपरीमांडवगण येथील शिवरस्त्याचे यशस्वी सीमांकन करण्यात आले. यामुळे हा उपक्रम राज्यासाठी दिशादर्शक ठरत आहे. मागील आठवड्यात बन पिंपरी येथील शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन छेडले होते. या पार्श्वभूमीवर चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी प्रशासनाशी संवाद साधून रस्ता मोकळा करण्यासाठी ठोस तारीख निश्चित केली होती.

त्याअनुषंगाने उपविभागीय अधिकारी कुमार चिंचकर, तहसीलदार सचिन डोंगरे, भूमी अधीक्षक अविनाश मिसाळ यांच्या आदेशाने, दादासाहेब जंगले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोजणी अधिकारी वासुदेव पाटील यांनी सीमांकनाची प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केली.

या वेळी मंडळ अधिकारी संतोष ढगे, ग्राम अधिकारी सय्यद,मांडवगण शेलार च. झ.बनपिंपरी सय्यद शाहरूख, बनपिंपरी गावचे सरपंच पठारे तसेच मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

प्रशासन व शेतकरी यांच्या समन्वयातून हे काम सुरळीत पार पडले.

या यशस्वी उपक्रमाबद्दल दादासाहेब जंगले पाटील यांनी सर्वांचे आभार मानले व व ते पुढे म्हणाले की, शासन निर्णयाची खरी ताकद प्रत्यक्ष अंमलबजावणीतूनच दिसून येते.

श्रीगोंदा तालुका आज राज्याला मार्गदर्शक ठरत असून ‘शेत तिथे रस्ता’ ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्याचा आदर्श निर्माण करत आहे. असे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

### आई-वडील सांभाळण्याचा अधिकार मुलींना दिला असता तर

# कोणीच वृद्धाश्रमांत गेले नसते : प्रकाश महाराज साठे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**खरवंडी कासार :** प्रत्येक मुलीला आई-वडिलांची जबाबदारी सांभाळण्याचा समान अधिकार दिला गेला असता तर समाजातील कोणाचेच आई-वडिलांना वृद्धाश्रमात जाण्याची वेळ येणार नाही. तसेच सुनेने सासू-सासऱ्यांची मनापासून सेवा केली, तर वृद्धाश्रम ही संकल्पनाच उरणार नाही, असे प्रभावी प्रतिपादन कथाकार प्रकाश महाराज साठे यांनी केले.

पाथर्डी तालुक्यातील बडेवाडी येथे संत भगवान बाबा यांनी प्रारंभ केलेल्या ९२ व्या फिरत्या नारळी सप्ताहा महंत डॉ नामदेव शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून निमित्त आयोजित भागवत कथेच्या कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी परिसरातील विविध गावांमधून आलेल्या भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

प्रकाश महाराज साठे यांनी आपल्या ओघवत्या व प्रभावी वाणीतून कुटुंबव्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, बदलत्या जीवनशैलीमुळे कुटुंबातील नातेसंबंधांमध्ये दुरावा निर्माण होत आहे. आई-वडिलांची सेवा ही केवळ मुलांचीच जबाबदारी आहे, असा गैरसमज समाजात निर्माण झाला आहे; मात्र मुलींनाही तेवढ्याच हक्काने व प्रेमाने ही जबाबदारी पार पाडता येते. योग्य संधी आणि पाठबळ दिल्यास मुली अधिक जिव्हाळ्याने आई-वडिलांची सेवा करतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

स्त्रीभ्रूण हत्येसारख्या गंभीर सामाजिक प्रश्नावर त्यांनी तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला. स्त्रीभ्रूण हत्या ही समाजासाठी घातक प्रवृत्ती असून ती तात्काळ थांबवली पाहिजे. मुलगी हीच कुटुंबाचा खरा आधार ठरू शकते. कन्यादानाच्या रूपाने ती वडिलांचे ऋण फेडते. त्यामुळे मुलगा-मुलगी असा भेदभाव न करता दोघांनाही समान संधी, शिक्षण आणि सन्मान दिला पाहिजे, असे ते म्हणाले.

तसेच कुटुंबातील सून-सासू-सासरे यांच्यातील नातेसंबंधांवर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, सून जर सासू-सासऱ्यांची सेवा आपल्या आई-वडिलांप्रमाणे करत असेल, तर घरात प्रेम, आपुलकी आणि समाधान नांदते. अशा सुदृढ कुटुंबव्यवस्थेमुळे वृद्धाश्रमांची गरज भासत नाही, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी संत भगवान बाबांच्या शिकवणीचा संदर्भ देत समाजात सदाचार, कर्तव्यनिष्ठा आणि सेवाभाव जोपासण्याचे आवाहन केले.

सप्ताहाच्या निमित्ताने परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून महिला भाविकांचा मोठा सहभाग विशेष लक्षणीय ठरला जात आहे कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बडेवाडी ग्रामस्थ अतिशय परिश्रम घेत आहे

बडेवाडी येथे मोठ्या उत्साहात सप्ताहा सुरू झाला आणि अवकाळी पाऊसाने बडेवाडी ग्रामस्था मध्ये अस्वस्थता पसरली मात्र पाऊसाने उघडीप दिल्या नंतर ग्रामस्थांना आनंद आश्रु आले मोठ्या जिद्दी ने हिमंतीने व आनंदात आलेल्या भावीकाना सप्ताहाच्या यज्ञ मंडपात मनतृप्त करणारे अन्नदान सुरु झाले तर ज्ञानदानाच्या कथा मंडपात व किर्तन मंडपात भावीक श्रोते यांनी अलोट गर्दी केल्याने बडेवाडी चा शिवार हा वारकरी व भावीकानी फुलन जात आहे तर या ठिकाणी येणाऱ्या भावीका साठी वेग वेगळ्या गावा मधुन अन्नदानासाठी दररोज टॅक्टर पिकअप रिक्षा मधुन भाकरी चपाती बुंदी बर्फी लाडु प्रसाद म्हणून ग्रामस्थ येथे वाजत गाजत घेऊन येत येणाऱ्या भावीकाना पंगती द्वारे महाप्रसाद वाटप करत आहेत.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

रविवार, दि.५ एप्रिल २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## मर्दानी ३’ ओटीटीवरही नंबर वन

## फ्रेंचायझीचा दमदार दबदबा

**मुंबई :** यश राज फिल्म्स निर्मित ‘मर्दानी ३’ हा नेटफ्लिक्स इंडियावर नंबर १ ठरत मोठा हिट ठरला आहे. राणी मुखर्जी प्रमुख भूमिकेत असलेल्या या चित्रपटामुळे ‘मर्दानी’ (२०१४) आणि ‘मर्दानी २’ (२०१९) हेही टॉप १० मध्ये ट्रेंड होत आहेत. ‘मर्दानी ३’ ने भारतात ५३ कोटींपेक्षा अधिक कमाई करत फ्रेंचायझीतील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला असून थिएटरमध्ये ५० दिवस पूर्ण केले आहेत. पहिल्याच दिवशी ४ कोटींची ओपनिंग मिळवत चित्रपटाने दमदार सुरुवात केली होती. दिग्दर्शक अभिराज मीनावाला व निर्माता आदित्य चोपड़ा यांच्या नेतृत्वाखाली ‘मर्दानी’ फ्रेंचायझीने महिला-केंद्रित चित्रपटांसाठी नवा मापदंड निर्माण केला आहे.



# भय इथले संपत नाही! सात्रळ येथे दुसरा बिबट्या जेरबंद

## दोन बिबट्यांची पिंजऱ्या भोवती चक्कर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** राहुरी तालुक्यातील सात्रळ येथे दावीद फकिरा पलघडमल यांच्या शेतात बिबट्या जेरबंद करण्यात वनविभाग व प्राणीमित्र यांना यश आले.

गेल्या महिन्यापासून पलघडमल/साबळे वस्तीवर तीन बिबट्यांनी मुक्काम ठोकला आहे त्यामुळे या परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते एक बिबट्या जेरबंद झाल्यानंतर पुन्हा त्याच जागेवर पिंजरा लावण्यात आला होता आणि दोन दिवसाच्या अंतराने दुसरा एक वर्ष वयाचे मादी बिबट्या जेरबंद झाले.

एक एप्रिल रोजी पुन्हा दावीद फकिरा पलघडमल यांच्या गट नंबर २९०/२ मध्ये पिंजरा लावण्यात आला होता. त्या पिंजऱ्यात कोंबड्या ठेवण्यात आल्या. शनिवार दिनांक ४ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजता कोंबड्यांच्या सावजाला आकर्षून बिबट्याचे एक वर्ष वयाचे मादी पिल्लू अलगत जेरबंद झाले.

सकाळी बिबट्या जेरबंद झाल्याचे कळताच त्यांनी सी.सी.टीवी फुटेज चेक केले असता दोन बिबटे पिंजऱ्याच्या कडेने फिरताना दिसून आले. प्रविण पलघडमल यांनी वनविभाग राहुरी व प्राणीमित्र विकास म्हस्के यांना माहिती दिली.


माहिती मिळताच सकाळी वनपाल एस. आर. कोरके, वनरक्षक घुगे, बी.आर.दिवे, एस. आर. झंझट, ड्रायव्हर तारु,प्राणीमित्र विकास म्हस्के घटनास्थळी पोहोचले. व सदर घटनेची माहिती अहिल्यानगर जिल्ह्याचे उपवनसंरक्षक अधिकारी श्री धर्मवीर सालविठ्ठल, सहाय्यक उपवनसंरक्षक अधिकारी गणेश मिसाळ, राहुरीचे वनपरिक्षेत्र अधिकारी सुनिल साळुंखे यांना देण्यात आली.

जेरबंद बिबट्याला दुसऱ्या पिंजऱ्यात शिफ्ट करून पिंजरा हलवण्याची कार्यवाही केली. आणि पिंजरा परत त्याच ठिकाणी लावण्यात आला.

यावेळी बिबट्याला पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी गर्दी केली होती व यावेळी प्रविण पलघडमल, सचिन पलघडमल , प्रभाकर पलघडमल , राजु साबळे, आरुष पडघडमल, मयूर पडघडमल, सतीश बर्डे, सोमनाथ बर्डे, विशाल गोधाडे यांनी मदत केली.

वनविभागाने परत पिंजरा लावल्याबद्दल परिसरातील नागरिकांची समाधान व्यक्त केले व वनविभागाचे आभार मानले.काही महिन्यापूर्वी पत्रकार अनिल वाकचौरे यांच्या मोटार सायकलवर बिबट्याने हल्ला केला होता आणि या हल्ल्यातून ते बालंबाल बचावले होते. आणि त्याच परिसरात दोन बिबटे जेरबंद झाल्यानंतर अजुन दोन बिबटे आढळून आल्याने पुन्हा पिंजरा लावण्यात आला.





## किरकोळ वादातून तरुणावर कुऱ्हाडीने हल्ला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** किरकोळ भांडणाच्या कारणावरुन आरोपींनी ओंकार शिंदे या तरुणाच्या डोक्यात कुऱ्हाड मारुन जखमी केले. तसेच लाथा बूक्क्यांनी बेदम मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. ही घटना राहुरी तालुक्यातील ब्राम्हणी येथे दि. २ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास घडली. ओंकार बालकनाथ शिंदे,( वय १७ वर्षे, रा. ब्राम्हणी, ता. राहुरी), हा तरुण दि. २ एप्रिल २०२६ रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास त्याच्या काही मित्रांबरोबर ब्राम्हणी गावातील यात्रेत गेला होता. त्यावेळी आरोपी कृष्णा शेगर याने ओंकार शिंदे याला शिवीगाळ केल्याने दोघांमध्ये किरकोळ मारहाण झाली होती. त्यानंतर आरोपी ओंकार शिंदे याच्या घरासमोर जाऊन शिवीगाळ करत होते. तेव्हा ओंकार शिंदे त्यांना समजावुन सांगत असताना आरोपींनी ओंकार शिंदे याच्या डोक्यात कुऱ्हाड मारुन जखमी केले. तसेच लाथा बूक्क्यांनी बेदम मारहाण केली. तसेच तुम्ही जर आमच्या नादी लागले तर तुम्हाला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी देऊन तेथुन निघुन गेले.घटने नंतर ओंकार बालकनाथ शिंदे याने राहुरी पोलीस ठाण्यात ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून आरोपी कृष्णा भगवान शेगर, संजय भगवान शेगर, संतोष भगवान शेगर, लक्ष्मी भगवान शेगर, रा. ब्राम्हणी, ता. राहुरी, या चार जणांवर गुन्हा रजि. नं. ३१३/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२), ११८ (१), ३ (५), ३५१ (२), ३५२ प्रमाणे शिवीगाळ, मारहाण व धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

## नेवासा येथे आज समता पतसंस्था शाखेचे उद्घाटन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :**कोपरगाव येथील ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांच्या मार्गदर्शनाखाली चाळीस वर्षाचा वारसा आणि एक लाखांपेक्षा अधिक सभासदांच्या विश्वासाचं नाव असलेल्या समता पतसंस्थेच्या २७ व्या नेवासा शाखेच्या नवीन अत्याधुनिक कार्यालयाचे उद्घाटन अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन चंद्रशेखर घुले पाटील व माजी आमदार पांडुरंग अभंग यांच्या अध्यक्षतेखाली रविवार दि.५ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता नेवासा शहरातील औदुंबर चौकात असलेल्या कुंभकर्ण यांच्या बिल्डिंग येथे होत आहे.

या कार्यक्रम प्रसंगी समता पतसंस्थेचे चेअरमन ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे,व्हाईस चेअरमन अरविंद पटेल, संचालक सर्वश्री जितेंद्र शहा, सरव्यवस्थापक सचिन भट्टड, संचालक दीपक अग्रवाल, निरव रावलिया, संदीप कोयटे,संचालिका श्वेता भरत अजमेरा, अक्षरा अनुप पटेल,संचालक गिरीश सोनेकर हे उपस्थित राहणार आहे.

समता पतसंस्थेच्या नेवासा शाखेच्या उदघाटनाला नेवासकर नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन समता शाखेचे जनसंपर्क प्रमुख पोपटराव साळवे व कर्मचारी वृंद यांनी केले आहे.




## रेल्वे रूळ ओलांडताना महिलेचा दुर्दैवी मृत्यू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** घाई घाईत रेल्वे पटरी ओलांडत असलेल्या एका ४८ वर्षीय महिलेला रेल्वेची जोरदार धडक बसली. या घटनेत महिला जागीच ठार झाल्याची घटना राहुरी तालुक्यातील टाकळीमियॉं शिवारात दि. ४ एप्रिल रोजी सकाळच्या सुमारास घडली. अनिता लक्ष्मण लाहुंडे, वय ४८ वर्षे, रा. टाकळीमियॉं, ता. राहुरी, ह्या शेत मजुरी करुन आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करत होत्या. दि. ४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ वाजे दरम्यान अनिता लाहूंडे ह्या शेत मजूरीसाठी मुसळवाडी येथे घाई घाईने जात होत्या. दरम्यान टाकळीमियॉं ते मुसळवाडी रस्त्यावरील बोगद्या जवळ अनिता लाहूंडे ह्या रेल्वे पटरी ओलांडत होत्या. त्यावेळी त्यांना दौंडकडून मनमाडकडे जाणाऱ्या मालवाहतूक गाडीची जोरदार धडक बसली. या धडकेत अनिता लाहूंडे यांना जबरदस्त मार लागल्याने त्या जागीच ठार झाल्या. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य केले. अनिता लाहूंडे यांच्या मृतदेहावर शवविच्छेदन करुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. अनिता लाहूंडे यांच्या पतीचे सुमारे १५ दिवसां पूर्वीच निधन झाल्याची माहिती मिळाली. त्यांच्या पश्चात दोन मुली, दोन मुलं, जावई असा परिवार असून त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# रेल्वे हद्दीतील अतिक्रमणे उद्यापासून काढणार!

### व्हायरल व्हिडिओमुळे खळबळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** रेल्वे प्रशासनाने श्रीरामपुर शहरात काल रेल्वे रूळाशेजारील अतिक्रमण हटवण्यासंदर्भात दवंडी दिली असून रेल्वे हद्दीतील अतिक्रमणे सोमवारपासून काढणार असल्याचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. या व्हायरल व्हिडीओमुळे अतिक्रमणधारकांमध्ये खळबळ उडाली आहे.

शहरातील सय्यदबाबा दर्ग्याच्या पाठीमागील डांबरी रस्ता आणि रेल्वे रूळ यांच्यामध्ये असणाऱ्या अतिक्रमणधारक परिसरात काल ही दवंडी देण्यात आली. या व्हायरल व्हिडीओमध्ये रेकॉर्ड केलेली दवंडी असून त्यात अतिक्रमणधारकांना उद्देशून आवाहन करण्यात आले आहे की, रेल्वेच्या हद्दीतील अतिक्रमणं काढण्याची मोहीम रेल्वे खात्याने हाती घेतली आहे. त्या अनुषंगाने उद्या सोमवार दि. ६ एप्रिलपासून अतिक्रमणं काढण्यात येणार आहे, तरी याची अतिक्रमणधारकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन या व्हायरल व्हिडीओतील दवंडीच्या स्पिकरमधून करण्यात आले. तसेच रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांनी सध्या त्यांना हवी असणाऱ्या जागेची हद्द त्यांनी आखून दिली आहे.गेल्या काही महिन्यांपासून श्रीरामपुरातील नेवासारोड, संगमनेररोड परिसरातील रेल्वे रूळालगत असलेल्या अतिक्रमणाबाबत अनेकदा नोटीसा आल्या. लवकरच ही अतिक्रमणे निघणार अशीही चर्चा रंगली. एवढेच नव्हेतर आज ना उद्या ही अतिक्रमणे रेल्वे काढणार असेही बोलले जात असताना आता वॉर्ड नं. २ मधील अतिक्रमणधारक परिसरात काल दवंडी देण्यात आल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर रेल्वे परिसरात असणाऱ्या अतिक्रमणधारकांमध्ये खळबळ उडाली आहे.

### पुणे विभागाचे रेल्वे प्रबंधक आज श्रीरामपूरात

*नगराध्यक्ष व नगरसेवक त्यांची भेट घेणाररेल्वे हद्दीतील अतिक्रमणे काढण्यासंदर्भात दवंडी काढल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर नगरसेवक रईस जहागिरदार यांच्या निवासस्थानी नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या उपस्थितीत मुस्लिम बांधवांची बैठक झाली. त्यावेळी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्याशी संपर्क साधला असता ते ९ एप्रिलपर्यंत दिल्लीत आहे. रेल्वे मंत्र्यांशी चर्चा करून मार्ग काढू असे सांगितले व प्रत्यक्ष आल्यावर भेटू. त्यांनी पुणे विभागातील रेल्वे प्रबंधक मेहता यांच्याशी चर्चा केली. त्यानुसार मेहता आज सकाळी बेलापूर रेल्वे स्थानकात येणार आहे. तेव्हा त्यांना भेटून याबाबत सविस्तर चर्चा कडून यावर मार्ग काढणार असल्याची माहिती नगरसेवक रईस जहागिरदार यांनी दिली.*

## नोकरीचे आमिष दाखवून फसवणूक; दोघांवर गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** सरकारी नोकरीचे आमिष दाखवून दोन बेरोजगार तरुणांकडून ४ लाख रुपये उकळल्याची घटना उघडकीस आली असून याप्रकरणी दोघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत राहुरी तालुक्यातील गुहा येथील कल्पना सोमनाथ कोळसे (वय ४१) यांनी राहुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, त्यांचा भाऊ किरण एकनाथ मुसमाडे व मावस भाऊ शुभम रामा वाकचौरे हे नोकरीच्या शोधात होते. दरम्यान, ओळखीच्या माध्यमातून आरोपींनी त्यांना सरकारी नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवले.

राहुरी फॅक्टरी येथील गिरीष मधुकर थोरात याने पुण्यातील अधिकाऱ्यांशी ओळख असल्याचे सांगत प्रत्येकी १२ लाख रुपयांत नोकरी लावण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार सुरुवातीला प्रत्येकी २ लाख रुपये देण्याची मागणी करण्यात आली. त्यावर विश्वास ठेवून फिर्यादींनी १७ एप्रिल २०२३ रोजी तुषार प्रताप शिंदे यांच्या बँक खात्यावर २ लाख ८५ हजार रुपये जमा केले, तसेच १ लाख १५ हजार रुपये रोख दिले.मात्र, ठरल्याप्रमाणे नोकरी न मिळाल्याने व पैसेही परत न केल्याने फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर कोळसे यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली.या प्रकरणी तुषार शिंदे (रा. आळे फाटा, ता. जुन्नर) व गिरीष थोरात (रा. राहुरी फॅक्टरी) यांच्यावर गुन्हा रजिस्टर नं. ३०२/२०२६ अन्वये भारतीय दंड संहिता कलम ४२० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### गावठी कट्ट्यासह..

## दहशत माजवणाऱ्याची काढली धिंड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** शहरातील बिफ मार्केट, वार्ड नंबर २ या ठिकाणी हातात गावठी कट्टा घेऊन लोकांना धमकावत दहशत निर्माण करणाऱ्या सराईत आरोपीचा पोलिसांनी शोध घेत त्याची शहरातून धिंड काढत त्याला शहरभर फिरविले. कायद्याचा चाप लावण्यासाठी अखेर पोलिसांनी आपला दंडुका उगारला आणि पोलीस ॲक्शन मोड मध्ये आले.

२२ मार्च रोजी रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार सरफराज बाबा शेख हा बिफ मार्केट, वार्ड नंबर २, श्रीरामपूर या हातात गावठी कट्टा घेऊन लोकांना धमकावत दहशत निर्माण केली होती. तेव्हापासून तो पसार होता. सर्फराज शेख हा ईदगाह मैदान, वार्ड नंबर २, श्रीरामपूर या ठिकाणी मिळून आला. त्याच्या अंगझडतीमध्ये एक गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुस मिळून आले.

या गुन्ह्यात सध्या सर्फराज शेख यास अटक केली आहे व तो पोलीस कस्टडी मध्ये आहे. सर्फराज शेखवर गंभीर स्वरूपाचे ७ गुन्हे दाखल असून नागरिकांमध्ये त्याची दहशत आहे. त्याची दहशत मोडून काढण्यासाठी शहर पोलिसांनी पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या नेतृत्वाखाली ज्या भागात त्याची दादागिरी आहे त्याच भागात त्याची धिंड आज काढली. पोलिसांच्या या कृतीचे नागरिकांतून स्वागत केले जात आहे.



## श्रीरामपुरात शिक्षकाला जबर मारहाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** येथील वॉर्ड नं. १ मधील उर्दू मदरसा शाळेतील शिक्षक अबुकर रशीद पठाण यांना शहरातील साखर कामगार हॉस्पिटल रोडवर उंडे हॉस्पीटलसमोर लाकडी दांड्याने मारहाण केली. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिक्षक अबुकर पठाण हे त्यांचा मेहुणा मुख्तार शेख यांना हॉस्पीटमध्ये भेटायला गेले असता त्यावेळी त्यांचा भाचा जैद शेख हा त्यांच्याबरोबर होता. त्यानंतर उंडे हॉस्पीटलसमोर लावलेली मोटारसायकल आणण्यासाठी अबुकर पठाण व त्यांचा भाचा गेले असता नेवासा रोडकडे येत असताना अनोळखी इसमांनी त्यांची गाडी अडवली. तेव्हा घाबरून ते पळत सुटले. तेव्हा उंडे हॉस्पीटल ते साखर कामगार हॉस्पीटल रोडवर तिघांनी पकडून काहीएक कारण नसताना मारहाण केली. त्यातील एकाने लाकडी दांड्याने तर दुसऱ्याने बेल्टने मारहाण केली. या मारहाणीत डोक्यास जखम झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात अबुकर पठाण यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी तिघा अनोळखी इसमांविरूद्ध गन्हा दाखल केला आहे.

## यात्रेच्या गर्दीत हॉटेलवर धाड

### मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाकडून

### चार महिलांची सुटका, दोघे ताब्यात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सुपा :** नगरपुणे महामार्गावरील जातेगाव शिवारातील ‘हॉटेल जयराज’वर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाने (क्ढण) टाकलेल्या धाडीत चार पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून हॉटेल चालकासह दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

यात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर परिसरात मोठी गर्दी असताना संबंधित हॉटेलमध्ये वेश्या व्यवसाय सुरू असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाईचे नियोजन करण्यात आले. पोलीस निरीक्षक हमीद शेख यांनी बनावट ग्राहक पाठवून खात्री करून घेतल्यानंतर धाड टाकण्यात आली. झडतीदरम्यान चार महिलांची सुटका करण्यात आली.या प्रकरणी कलंदर सत्तार अली शेख (रा. वडू रोड, कोरेगाव भीमा, जि. पुणे) व हनुमंत अशोक देटके (रा. नागटापी सासपडी, जि. सातारा) यांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याविरुद्ध सुपा पोलीस ठाण्यात अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दरम्यान, या भागात अनैतिक व्यवसायाबाबत पूर्वीच माहिती देऊनही कारवाईला विलंब झाल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. स्थानिक पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित करत अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी सातत्याने छापे व कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# आश्वी खुर्दमध्ये घरावर वीज कोसळली

## थोडक्यात टळली जीवितहानी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील आश्वी खुर्द परिसरात शुक्रवारी (दि. ३ एप्रिल) सायंकाळी निसर्गाचा रौद्र अवतार पाहायला मिळाला. अचानक आलेल्या वादळी पावसासह झालेल्या भीषण वीजपाताने सोनवणे वस्तीवरील एका घराचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने, या भयानक संकटातून घरातील सदस्य सुखरूप बचावल्याने मोठी जीवितहानी टळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रवरा बँकेचे सेवानिवृत्त शाखा व्यवस्थापक प्रकाश सोनवणे यांच्या घरावर सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास थेट वीज कोसळली. पावसाला सुरुवात झालेली असतानाच अचानक कानठळ्या बसवणारा आवाज आणि मोठा धक्का जाणवल्याने घरातील सदस्य भयभीत झाले. घराच्या स्लॅबवर बसवलेला ’जैन सोलर’ कंपनीचा सोलर वॉटर हीटर या विजेच्या तडाख्यात अक्षरशः जळून खाक झाला.

विजेचा प्रहार इतका तीव्र होता की, सोलर सेट पूर्णपणे निकामी झाला असून त्याच्या काचा घराच्या परिसरात विखुरल्या गेल्या. तसेच, इमारतीच्या स्लॅबलाही मोठे तडे गेले आहेत. ज्या खोलीच्या वर वीज पडली, तिथेच कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. घर स्लॅबचे असल्याने बचावलो, जर पत्र्याचे असते तर मोठा अनर्थ घडला असता, अशी भावना कुटुंबीयांनी व्यक्त केली. या प्रसंगानंतर सौ. शोभना सोनवणे यांनी नशीब बलवत्तर म्हणून आम्ही वाचलो अशा शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या.



गेल्या चार दिवसांपासून आश्वी परिसरात दुपारनंतर पावसासह विजांचा कडकडाट आणि जोरदार वारे वाहत आहेत. या अवकाळी संकटामुळे हाताशी आलेल्या गहू व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकरी वर्ग चिंतेत सापडला आहे. प्रशासनाने या नुकसानीचे त्वरित पंचनामे करावेत, अशी मागणी परिसरातून होत आहे.